cmyk

## संपादकीय

### निधी नव्हता की इच्छाशक्ती नव्हती?

लोकशाहीमध्ये निवडणूक ही केवळ सत्ता मिळवण्याची प्रक्रिया नसते; ती मतदार आणि प्रतिनिधी यांच्यातील विश्वासाचा करार असतो. मतदार एखाद्या उमेदवाराला मतदान करताना त्याच्या नावापेक्षा अधिक महत्त्व पक्षाच्या विचारधारेला, घोषणापत्राला आणि राजकीय भूमिकेला देतो. त्यामुळे निवडून आलेला प्रतिनिधी पक्ष बदलतो तेव्हा तो केवळ राजकीय निर्णय नसतो, तर मतदारांच्या विश्वासाची परीक्षा असते.

दैनिक www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–९४ | बुधवार दि.२४ जून २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### स्व.अजितदादा यांच्या स्मारकास एकमताने मंजुरी

बारामती: बारामती नगर परिषदेच्या सर्वसाधारण सभेत स्वर्गीय लोकनेते तथा महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या स्मृतीप्रित्यर्थ ३.५ एकर जागेत भव्य स्मारक उभारण्याच्या प्रस्तावास एकमताने मंजुरी देण्यात आली. सभागृहात सर्व सदस्यांनी दादांच्या बारामती, पुणे जिल्हा आणि महाराष्ट्राच्या विकासातील अतुलनीय योगदानाचा गौरव करत हे स्मारक भावी पिढ्यांसाठी प्रेरणास्थान ठरावे, अशी भावना व्यक्त केली. यावेळी नगराध्यक्ष सचिन सातव यांनी प्रस्तावाची माहिती देताना स्मारकाच्या संकल्पनेबाबत सविस्तर माहिती दिली. दादांच्या दूरदृष्टीची आठवण सांगताना त्यांनी भावूक होत सांगितले की, याच ठिकाणी उंच मनोरा उभारून विकसित झालेली बारामती नागरिकांना पाहता यावी, असा दादांचा मानस होता. मात्र, नियतीच्या क्रूर खेळामुळे आज त्याच ठिकाणी त्यांचे स्मारक उभारण्याचा निर्णय घ्यावा लागत असल्याबद्दल त्यांनी दु:ख व्यक्त केले. दादांचे स्वप्न, त्यांची विकासदृष्टी आणि जनतेशी असलेले नाते कायम स्मरणात राहावे, यासाठी हे स्मारक उभारले जात असल्याचे त्यांनी नमूद केले. सभागृहातील चर्चेदरम्यान नगरसेवक नवनाथ बल्लाळ यांनी दादांच्या व्यक्तिमत्त्वाला साजेसे, दर्जेदार आणि भव्य स्मारक उभारण्यात यावे, असे मत व्यक्त केले.

### अलका याज्ञिक पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित

दिल्ली: पार्श्वगायिका अलका याज्ञिक यांना भारतीय संगीत आणि चित्रपटसृष्टीतील त्यांच्या अमूल्य योगदानासाठी पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राष्ट्रपती भवन येथील सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. १९९० आणि २००० च्या दशकात त्यांनी अगणित हिट गाणी हिंदी चित्रपटसृष्टीला दिली आहेत. खलनायक, दिलवाले दुल्हनिया ले जाएंगे, ताल यांसारख्या एकापेक्षा एक चित्रपटांमधील अविस्मरणीय गाण्यांना आपला स्वरसाज दिला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मंगळवारी राष्ट्रपती भवनात आयोजित दुसऱ्या नागरी सन्मान सोहळ्यात पद्म पुरस्कार प्रदान केले. यामध्ये एकूण ६५ पद्म पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यामध्ये २ पद्म विभूषण, ७ पद्म भूषण आणि ५६ पद्मश्री पुरस्कारांचा समावेश होता.

### जंतरमंतरवर तुकडे तुकडे गँग–शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान

दिल्ली: ''ज्या लोकांना देशाचे टुकड़े करायचे आहेत, तेच लोक दिल्लीतील जंतरमंतरवर डफली वाजवत आहेत. तिथे एकतरी विद्यार्थी आहे का?'', असा सवाल करत ''विरोधी पक्षनेते म्हणून प्रश्न विचारण्याचा राहुल गांधी यांना पूर्ण अधिकार आहे. परंतु, त्यांनी विद्यार्थ्यांच्या मनात विनाकारण भीती निर्माण करू नये,'' असे आवाहनही केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी केले. एका मुलाखतीत प्रधान म्हणाले की, प्रत्येकाला आंदोलनाचा लोकशाही अधिकार आहे, परंतु काही आंदोलनांमागील हेतू संशयास्पद आहे. काही लोक विद्यार्थ्यांच्या नावाने तिथे जमतात. आमचा त्याला विरोध नाही, संविधानाने त्यांना तो अधिकार दिला आहे. पण देशही याचे मूल्यमापन करत आहे,'' असे ते म्हणाले. राहुल गांधी आणि सीजेपी च्या आंदोलनाचा संदर्भ देत प्रधान म्हणाले की, ''तुम्हाला विद्यार्थ्यांमध्ये भीती आणि संभ्रम निर्माण करायचा होता, पण त्यात तुम्ही यशस्वी झाला नाहीत.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२३ जून २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २८.५० क्विंटल | २,४३६ | २,५०० | २,४७६ |
| ज्वारी/हायब्रिड : ९५.०० क्विंटल | २,२९२ | ४,१७६ | २,६४१ |
| मका/लोकल: ४.०० क्विंटल | १,८१० | २,०५० | १,९३० |
| तूर : ०.५० क्विंटल | ७,३०० | ७,३०० | ७,३०० |
| उडीद : १.०० क्विंटल | ४,७०० | ४,७०० | ४,७०० |
| बाजरी: २२.०० क्विंटल | १,८७० | ३,१०१ | २,४५७ |
| मुग: ४.०० क्विंटल | ७,००१ | ७,००१ | ७,००१ |
| सोयाबीन:१५.०० क्विंटल | ६,६५० | ६,६५० | ६,६५० |
| हरभरा: १०.५० क्विंटल | ४,३०१ | ५,४५० | ५,१०२ |

# 'आड रानातील विहीर आणि लबाडा घरची खीर'

## कर्जमाफीवरून दानवेंचा सरकारवर घणाघात

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य सरकारच्या शेतकरी धोरणांवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे विधानपरिषदेतील विरोधी पक्षनेते आमदार अंबादास दानवे यांनी मंगळवारी (दि. २३) जोरदार हल्लाबोल केला. शेतकरी कर्जमाफी, पीकविमा, वीजपुरवठा, कांदा उत्पादकांचे प्रश्न, कापूस आयात आणि सौर पंप योजनांवरून सरकारला धारेवर धरताना, ''आड रानातील विहीर आणि लबाडा घरची खीर याचं काही खरं नसतं,'' अशा शब्दांत त्यांनी महायुती सरकारवर टीकास्त्र सोडले.

पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विधानपरिषदेत सत्ताधारी पक्षाने मांडलेल्या २६० च्या प्रस्तावावर बोलताना दानवे म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेत तब्बल



१९ अटी घालण्यात आल्या आहेत. सरकारने कर्जमाफीची घोषणा केली असली तरी प्रत्यक्षात शेतकऱ्यांना लाभ मिळू नये यासाठीच या अटी घालण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. ''हा प्रस्ताव शेतकऱ्यांच्या हितासाठी नसून सरकारची शेखी मिरवण्यासाठी आहे,'' अशी टीका त्यांनी केली. दानवे यांनी सांगितले की, २०१९ मध्ये महाविकास आघाडी सरकारने कोणत्याही अटी–शर्तींशिवाय दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी दिली होती. मात्र सध्याच्या योजनेत १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जांनाच पात्रता देण्यात आली आहे. त्यामुळे २०१९ पूर्वीचे कर्जदार आणि

▶▶ पान २ वर

### » कापूस उत्पादकांचे प्रश्न

कापूस उत्पादकांच्या प्रश्नावर बोलताना दानवे म्हणाले, ''कापसावरीलआयात शुल्क कमी केल्यामुळे कापसाचे भाव कोसळले. हंगामाच्या सुरुवातीला कापसाला १० ते ११ हजार रुपयांपर्यंत दर मिळण्याची शक्यता निर्माण झाली होती. मात्र आयातीला परवानगी दिल्यानंतर बाजारभाव घसरले. देशात आवश्यक दर्जाचा कापूस उपलब्ध असतानाही आयात वाढवून शेतकऱ्यांच्या हिताला धक्का दिला जात आहे. तसेच किमान आधारभूत किंमत दराने खरेदी होत नसल्याची आणि कापूस महामंडळाची खरेदी केंद्रे प्रभावीपणे सुरू नाही.''असेही आमदार दानवे यांनी सांगितले.

### » अनुदान रखडले

अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी जाहीर करण्यात आलेल्या ३१ हजार ६२८ कोटी रुपयांच्या मदत पॅकेजबाबतही आमदार दानवे यांनी प्रश्न उपस्थित केले. खरडून गेलेल्या जमिनीसाठी ३.४७ लाख रुपये मदत देण्याची घोषणा झाली होती. मात्र प्रत्यक्षात असा लाभ मिळालेला एकही शेतकरी दाखवावा, असे आव्हान त्यांनी सरकारला दिले. जनावरे वाहून गेलेल्या शेतकऱ्यांनाही पुरेशी मदत मिळालेली नसल्याचा आरोपही दानवे यांनी केला.

# एसटी कर्मचाऱ्यांना ३ टक्के वेतनवाढ

## मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती, घरभाडे भत्यातही वाढ

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य परिवहन (एसटी) महामंडळातील सुमारे ८६ हजार कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांना न्याय देण्यासाठी शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला असून, राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणेच एसटी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्ता, घरभाडे भत्ता आणि वार्षिक वेतन वाढ करण्यास मंजुरी देण्यात आली आहे, अशी घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मंगळवारी विधानसभा व विधान परिषद सभागृहात केली.

विधानसभेत व विधानपरिषदेत निवेदन करताना मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, एसटी ही केवळ परिवहन संस्था नसून महाराष्ट्राच्या सर्वसामान्य जनतेची जीवनवाहिनी आहे. गेली आठ दशके 'लालपरी'ने राज्यातील शेतकरी, विद्यार्थी, कामगार, महिला, ज्येष्ठ नागरिक



आणि दुर्गम भागातील नागरिकांना सेवा दिली आहे. या सेवेमागे एसटी कर्मचाऱ्यांचे योगदान मोलाचे असून त्यांच्या न्याय्य मागण्यांबाबत शासनाने सकारात्मक भूमिका घेतली असल्याचे सांगितले. पुढे बोलताना प्रताप सरनाईक म्हणाले की, या निर्णयानुसार एसटी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ५३ टक्क्यांवरून ५८ टक्के करण्यात आला आहे; तसेच घरभाडे भत्ता ८–१६–२४ टक्क्यांवरून १०–२०–३० टक्के करण्यात आला आहे. वार्षिक वेतनवाढीचा दर २ टक्क्यांवरून

▶▶ पान २ वर

# घुले हत्येप्रकरणी सर्व आरोपींची पाळेमुळे खणून खरा सूत्रधार शोधा!

## न्यायासाठी धनंजय मुंडे, आ.नमिता मुंदडा यांनी उठविला आवाज

**मुंबई । प्रतिनिधी**

वीस जूनच्या रात्री केज तालुक्यात घडलेल्या दुर्दैवी घटनेत हत्येचा कट रचून हल्ला एकावर केला मात्र सोडवण्यासाठी आलेल्या विलास घुले याच्यावर वार करून हत्या करण्यात आली. हे संपूर्ण प्रकरण पूर्वनियोजित कट असून याचा खरा सूत्रधार कोण, याचा शोध घेऊन विलास घुले याला न्याय मिळावा यासाठी केजमध्ये हजारो लोक घुले कुटुंबियांच्या सोबत रस्त्यावर उतरले आहेत, त्यामुळे पोलिस प्रशासनाने या प्रकरणात आरोपींची सर्व पाळेमुळे खोदून काढत खरा सूत्रधार कोण





आहे, याचा तपास करावा, अशी मागणी माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी आज विधानसभेत पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या माध्यमातून केली आहे. याच विषयावर केजच्या आमदार नमिता मुंदडा यांनीही आवाज उठविला असून,कठोर कारवाईची मागणी केली आहे.


विलास घुले या निष्पाप तरुणाला विनाकारण आपले प्राण गमवावे लागले, याचा तीव्र निषेध करत कुटुंबीय व हजारो नागरिक रस्त्यावर उतरले असून, हत्येच्या मंगळवारी चौथ्या दिवशी सुद्धा मृतदेह ताब्यात घेऊन अंत्यसंस्कार करण्यास घुले कुटुंबियांनी नकार दिला आहे. दुसरीकडे हजारो नागरिक रस्त्यावर उतरले असून, केजमध्ये कडकडीत बंद पुकारण्यात आला आहे. पोलिस ठाणे व अन्य ठिकाणी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. दरम्यान, हे प्रकरण अत्यंत गंभीर असून, या प्रकरणी कट रचून एका

▶▶ पान २ वर

# भूसंपादनाचे १ कोटी ३१ लाखाची रक्कम उच्च न्यायालयात जमा

**जालना । प्रतिनिधी**

दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या भूसंपादन व जप्ती प्रकरणात जालना जिल्हा प्रशासनाच्या पाठपुराव्यामुळे महत्त्वपूर्ण प्रगती झाली असून, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या प्रयत्नांतून कार्यकारी अभियंता, जालना पाटबंधारे विभाग, जालना यांनी रुपये १ कोटी ३१ लाख ९३ हजार ५६ इतकी रक्कम उच्च न्यायालयात जमा केली आहे. या कार्याबद्दल मौजे देवला, ता. परतूर



येथील रामदास लाटे व शंकर लाटे यांनी जिल्हाधिकाऱ्यांचा सत्कार करून त्यांचे आभार मानले.

प्राप्त माहितीनुसार, संबंधित भूसंपादन व जप्ती प्रकरण अनेक वर्षांपासून न्यायप्रविष्ट होते. या प्रकरणात न्यायालयीन आदेशानुसार आवश्यक रक्कम जमा करण्याची प्रक्रिया रखडलेली होती. मात्र जिल्हाधिकारी यांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत संबंधित विभागांशी सातत्याने समन्वय साधून आवश्यक कार्यवाही केली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली जालना पाटबंधारे विभागाने आवश्यक निधीची पूर्तता करून एकूण रु.१,३१,९३,०५६ इतकी रक्कम उच्च न्यायालयात जमा केली.

▶▶ पान २ वर

# खा.ओमराजे यांच्याविरोधात लहान बंधू मकरंदराजे यांचे बंड!

## उद्धव ठाकरे ॲक्शन मोडवर; २८ तारखेला करणार धाराशिवचा दौरा

**मुंबई । प्रतिनिधी**

मतदारसंघाच्या हितासाठीच आपण उद्धव ठाकरेंची साथ सोडल्याचे ओमराजेंनी स्पष्ट केले असले, तरी आता त्यांच्या या निर्णयाला त्यांच्याच घरातून तीव्र विरोध झाला आहे. ओमराजे निंबाळकर यांचे लहान बंधू आणि माजी नगराध्यक्ष मकरंदराजे निंबाळकर यांनी



आता आपल्याच मोठ्या भावाविरोधात थेट राजकीय शिंग फुंकले असून, ओमराजेंची भूमिका आपल्याला अजिबात पटलेली नसल्याचे सांगत उद्धव ठाकरेंशी एकनिष्ठ राहण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या अत्यंत वेगाने आणि नाट्यमय घडामोडी घडत आहेत. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या ६ खासदारांनी

▶▶ पान २ वर

# तुकाराम मुंढेंकडून महत्त्वाची जबाबदारी काढून घेतली

**मुंबई । प्रतिनिधी**

अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तपदाचा पदभार स्वीकारल्यापासून धडाडीची कामगिरी करणाऱ्या तुकाराम मुंढे यांच्यासंबंधी एक मोठी माहिती समोर आली आहे. त्यांच्याकडे असलेल्या परभणीच्या पालक सचिवपदाच्या जबाबदारीतून मुक्त करण्यात आलं आहे. त्यांच्याऐवजी डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्याकडे आता परभणीच्या पालक सचिवपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. दिव्यांग कल्याण विभागाचे प्रधान सचिव असताना, २३ फेब्रुवारी २०२६ रोजी तुकाराम मुंढे यांच्याकडे परभणीच्या पालक सचिवपदाची जबाबदारी देण्यात होती.



एफडीएचे आयुक्त तुकाराम मुंढे हे या आधी मंत्रालयात सचिव असताना त्यांच्याकडे परभणी जिल्ह्याच्या पालक

▶▶ पान २ वर

# नवनिर्वाचित १६ आमदारांचा शपथविधी

## महायुतीचे वर्चस्व, अपक्ष गोकुळ गीते शिंदेंच्या शिवसेनेत

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विधानपरिषद निवडणुकांचा निकाल २२ जून रोजी जाहीर झाल्यानंतर, मंगळवारी विधानपरिषद सभागृहात नवनिर्वाचित आमदारांचा शपथविधी सोहळा दिमाखात संपन्न झाला. गेल्या दोन महिन्यांत पार पडलेल्या वेगवेगळ्या निवडणुकांमध्ये निवडून आलेल्या एकूण १६ सदस्यांनी आज आमदारकीची शपथ घेतली. यामध्ये पुण्याचे विक्रम काकडे, सोलापूरचे राजेंद्र राऊत, रत्नागिरीचे अनिकेत तटकरे आणि साताऱ्याचे धैर्यशील कदम यांच्यासह इतर आमदारांचा समावेश आहे.

या निवडणुकीत महायुतीने ११ पैकी १० जागांवर दणदणीत विजय मिळवला, मात्र नाशिकमध्ये शिवसेना महायुतीचे उमेदवार नरेंद्र दराडे यांना पराभवाचा सामना करावा लागला होता. या पराभवानंतर महायुतीत राजकीय आरोप–प्रत्यारोप सुरू झाले असतानाच,नाशिकमधून विजयी झालेले अपक्ष उमेदवार गोकुळ गीते यांनी निकालाच्या संध्याकाळीच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. गीते यांनी शिवसेनेचे सहयोगी सदस्यपद स्वीकारल्याने तेही आता

▶▶ पान २ वर

# सरकारी डॉक्टरने खासगी प्रॅक्टिस करणे गंभीर बाब!

## सर्वोच्च न्यायालयाने फटकारले, चौकशी करण्याचे दिले आदेश




**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**सरकारी दवाखान्यात कार्यरत असणाऱ्या डॉक्टरांनी खासगी प्रॅक्टिस करण्याबाबत उच्चस्तरीय चौकशी करण्याचे निर्देश देण्याच्या उच्च न्यायालयाच्या आदेशात हस्तक्षेप करण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे. ''उच्च न्यायालय एका व्यापक सार्वजनिक मुद्द्यावर विचार करत होते. हे एक अतिशय चांगले कार्य आहे. कारण सरकारी डॉक्टरांनी खासगी प्रॅक्टिस करणे ही गंभीर बाब आहे, असे करू नये आणि तुम्हीही एक डॉक्टर आहात,'' असेही न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठाने याचिकाकर्त्यांना सुनावले.**

वृत्तानुसार, ४ मे २०२६ रोजी उच्च न्यायालयाने डॉ. संतोष कुमार सिंग आणि त्यांच्या पत्नीविरुद्ध दाखल झालेल्या एफआयआरची दखल घेतली होती. न्यायालयाला सांगण्यात आले की, डॉ. सिंग यांच्या पत्नी अकुरा हॉस्पिटल या खाजगी नर्सिंग होमच्या संचालिका आहेत, जिथे डॉ. सिंग शस्त्रक्रिया करत असल्याचा आरोप आहे. उच्च न्यायालयाने ही बाब अत्यंत गंभीर असल्याचे म्हटले होते. यापूर्वीही असेच आरोप झाले होते आणि जिल्हाधिकाऱ्यांकडून मागवण्यात आलेला अहवाल सादर करण्यात आला नव्हता, हे लक्षात घेऊन उच्च न्यायालयाने उत्तर प्रदेशच्या मुख्य सचिवांना योग्य ती कारवाई करण्याचे आणि वैद्यकीय महाविद्यालयात खासगी प्रॅक्टिस करणाऱ्या डॉक्टरांविरुद्ध उच्चस्तरीय चौकशी समिती स्थापन करण्याचे आदेश दिले होते. तसेच रुग्णालयातील बांधकाम कामांवर लक्ष ठेवण्याचे निर्देशही मुख्य सचिवांना दिले होते. अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाविरोधात वैद्यकीय महाविद्यालयाच्या शस्त्रक्रिया विभागातील

▶▶ पान २ वर

# नांगरे पाटील नागपूरचे नवे पोलीस आयुक्त

**नागपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र पोलीस दलातून एक अत्यंत महत्त्वाची आणि मोठी बातमी समोर येत आहे. नागपूरचे पोलीस आयुक्त रवींद्र सिंघल यांची बदली करण्यात आली असून, त्यांच्या जागी राज्याचे डॅशिंग आयपीएस अधिकारी विश्वास नांगरे पाटील यांची नागपूरचे नवे पोलीस आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. गृह विभागाने या संदर्भातील अधिकृत आदेश जारी केले असून, या मोठ्या फेरबदलामुळे पोलीस दलासह राजकीय वर्तुळातही चर्चांना उधाण आलं आहे. या बदली प्रक्रियेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे दोन्ही वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पदांची परस्परांमध्ये अदलाबदल करण्यात आली आहे, विश्वास नांगरे पाटील : हे आतापर्यंत राज्याचे लाचलुचपत प्रतिबंधक

▶▶ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# निधी नव्हता की इच्छाशक्ती नव्हती?

लोकशाहीमध्ये निवडणूक ही केवळ सत्ता मिळवण्याची प्रक्रिया नसते; ती मतदार आणि प्रतिनिधी यांच्यातील विश्वासाचा करार असतो. मतदार एखाद्या उमेदवाराला मतदान करताना त्याच्या नावापेक्षा अधिक महत्त्व पक्षाच्या विचारधारेला, घोषणापत्राला आणि राजकीय भूमिकेला देतो. त्यामुळे निवडून आलेला प्रतिनिधी पक्ष बदलतो तेव्हा तो केवळ राजकीय निर्णय नसतो, तर मतदारांच्या विश्वासाची परीक्षा असते.

महाराष्ट्रात शिवसेना ठाकरे गटातील सहा खासदारांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला. त्यांच्या पक्षांतरामागे प्रमुख कारण म्हणून ''विकासकामांसाठी निधी मिळत नव्हता'' हा दावा पुढे करण्यात आला. परंतु आता समोर आलेली आकडेवारी या दाव्यालाच प्रश्न विचारत आहे. संजय ऊर्फ बंडू जाधव यांना १४.७० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला होता. त्यापैकी केवळ ३.७८ कोटी रुपये खर्च झाले आणि ५६ पैकी २५ कामे पूर्ण झाली. ओमराजे निंबाळकर यांना १८.५० कोटी मंजूर असूनही केवळ १.९७ कोटी रुपये खर्च झाले आणि १३० पैकी फक्त २१ कामे पूर्ण झाली. नागेश पाटील आष्टीकर यांनी १९ कोटींपैकी ५.०६ कोटी खर्च केले. सर्वात धक्कादायक आकडेवारी भाऊसाहेब वाकचौरे, संजय दिना पाटील आणि संजय देशमुख यांची आहे. वाकचौरे यांना १४.०७ कोटी मंजूर असताना केवळ ७१ लाख रुपये खर्च झाले आणि १३५ पैकी फक्त २ कामे पूर्ण झाली. संजय दिना पाटील यांना १४.७० कोटी निधी मंजूर असूनही केवळ १५ लाख रुपये खर्च झाले आणि ४० पैकी एकही काम पूर्ण झाले नाही. संजय देशमुख यांना १८.०६ कोटी निधी मंजूर असताना फक्त १.४२ कोटी रुपये खर्च झाले आणि १०६ पैकी केवळ ७ कामे पूर्ण झाली. ही आकडेवारी पाहिल्यानंतर एक मूलभूत प्रश्न उभा राहतो. जर निधीच मिळत नव्हता, तर कोट्यवधी रुपयांचा मंजूर निधी आला कुठून? आणि जर निधी मंजूर झाला होता, तर तो खर्च का झाला नाही? विकासकामे रखडली त्यासाठी जबाबदार कोण? प्रशासन, यंत्रणा की स्वतः लोकप्रतिनिधी? लोकशाहीमध्ये अधिकारांसोबत उत्तरदायित्वही येते. निधी मंजूर होणे ही पहिली पायरी असते; तो प्रभावीपणे खर्च करून विकासकामे पूर्ण करणे ही खरी कसोटी असते. त्यामुळे आज प्रश्न केवळ निधीचा नाही, तर कामगिरीचा आहे. पण या प्रकरणातून एक अधिक गंभीर प्रश्न समोर येतो. जर निवडून आलेले प्रतिनिधी जनादेश मिळाल्यानंतर पक्ष बदलू शकत असतील, तर निवडणुकांचा अर्थ काय उरतो? मतदारांनी एका पक्षाच्या चिन्हावर विश्वास ठेवून मतदान केले, पण काही वर्षांत तो प्रतिनिधी दुसऱ्या पक्षात गेला, तर मतदारांच्या मताचा सन्मान कुठे राहतो?

भारतात पक्षांतरविरोधी कायदा आहे. तरीही राजकीय समीकरणे, गटफुटी आणि तांत्रिक तरतुदींच्या माध्यमातून पक्षांतराचे मार्ग शोधले जातात. कायदेशीरदृष्ट्या हे योग्य असू शकते, पण नैतिकदृष्ट्या त्याचे समर्थन करणे कठीण आहे. कारण जनादेश हा मतदारांचा असतो, कोणत्याही खासदार किंवा आमदाराची खाजगी मालमत्ता नसते. लोकशाहीतील सर्वात मोठी ताकद म्हणजे जनतेचा विश्वास. आणि तोच विश्वास वारंवार पक्षांतरामुळे कमकुवत होत असेल, तर लोकशाहीची मुळेच हादरू शकतात. म्हणूनच पक्षांतर करणाऱ्या प्रत्येक लोकप्रतिनिधीने पुन्हा मतदारांच्या न्यायालयात जाऊन जनादेश मागावा, अशी मागणी देशभरातून वारंवार होत असते. आजचा मुद्दा कोणत्या पक्षाचा किंवा कोणत्या नेत्याचा नाही. मुद्दा आहे लोकशाहीच्या मूल्यांचा. निवडणुकीपूर्वी दिलेली आश्वासने आणि निवडणुकीनंतर केलेली कृती यामधील दरी किती वाढली आहे, याचा. समोर आलेली आकडेवारी निधी न मिळाल्याच्या दाव्याला प्रश्न विचारते. त्याची उत्तरे संबंधित खासदारांनी आणि राजकीय पक्षांनी द्यायला हवीत. कारण मतदारांना केवळ राजकीय भूमिका बदलल्याचे कारण नव्हे, तर विकासकामांचा हिशेबही हवा आहे. शेवटी एकच प्रश्न उरतो जर निवडून आल्यावर पक्ष बदलायचाच असेल, तर निवडणुका कशासाठी?

# आष्टी-मुर्शदपूर भागातील नागरी सुविधांवर भर देणार-आ.धस

## लवकरच मुर्शदपुर भागाचा नगरपंचायतमध्ये समावेश



आष्टी । प्रतिनिधी

आष्टी शहरालगत वेगाने विस्तारत असलेल्या मुर्शदपूर परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यावर विशेष भर दिला जाणार असल्याची ग्वाही आमदार सुरेश धस यांनी दिली. वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर रस्ते, पाणीपुरवठा, गटार व्यवस्था, वीज, सार्वजनिक आरोग्य सुविधा तसेच इतर मूलभूत सोयी-सुविधा सक्षम करण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मुर्शदपूर परिसर हा भविष्यातील विकासाचे केंद्र म्हणून उदयास येत असून, या भागात नियोजनबद्ध पायाभूत सुविधा उभारून नागरिकांना दर्जेदार जीवनमान उपलब्ध करून देण्याचा मानस असल्याचेही आ. धस यांनी सांगितले. विकासकामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून विविध प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.

वाढत्या शहरीकरणामुळे नागरिकांच्या अपेक्षा वाढल्या असून, त्यानुसार रस्त्यांचे मजबुतीकरण, पिण्याच्या पाण्याची शाश्वत व्यवस्था, स्वच्छता, प्रकाश व्यवस्था आणि सार्वजनिक सुविधांच्या उभारणीसाठी ठोस नियोजन करण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले. ''विकास ही केवळ घोषणा नसून नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणण्याची प्रक्रिया आहे. मुर्शदपूर परिसराचा संतुलित व सर्वसमावेशक विकास करून या भागाला नवी ओळख देण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत,'' असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले. स्थानिक नागरिकांनीही परिसरातील विकासकामांना गती मिळाल्यास मुर्शदपूर भागाचा चेहरामोहरा बदलून हा परिसर अधिक सुसज्ज आणि आदर्श वसाहत म्हणून विकसित होईल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

# गजानन विद्यालयात जागतिक योग दिन साजरा

**नवगण राजुरी । प्रतिनिधी**

**येथील गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.**

गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात जागतिक योग दिनानिमित्त योगासनाचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम संस्थेच्या संस्थापिका स्व.केशरकाकू क्षीरसागर यांच्या प्रतिमेची पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. या कार्यक्रमासाठी योगासनाबद्दल योग गुरु म्हणून विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रशांत पवळ हे उपस्थित होते. सर्वप्रथम त्यांनी विद्यार्थ्यांना योगासनाचे



फायदे व निरोगी आयुष्य कशाप्रकारे बनते असे सांगून मुलांना सखोल असे मार्गदर्शन केले व त्यानंतर प्रत्यक्षात योगासनाची कृती विद्यार्थी व शिक्षक वृंद यांच्या समवेत शरीरातील विविध अवयव सदृढ करण्याचे योगासने कृतीतून करून दाखव ले याप्रसंगी विद्यालयाचे उपमुख्याध्यापक शिंदे एस. एस. पर्यवेक्षक दगडे व्ही.एन. शेख एस.वाय, भोसले बी. एस शिक्षक, शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयदीप सरवदे यांनी केले व आभार प्रदर्शन नितीन शिंदे यांनी मानले.राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# आदर्श गुरुकुलात योग दिन उत्साहात साजरा



**माजलगाव । प्रतिनिधी**

**भारतीय जन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित आदर्श गुरुकुल माजलगाव या ठिकाणी दि. २१ जून आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त रविवार रोजी सकाळी ९ वाजता आर्ट ऑफ लिविंगचे प्रशिक्षक श्री. नंदकुमारजी शिंदे, आदर्श गुरुकुलचे मार्गदर्शक श्री. केशव बादाडे, संचालक ओंकार बादाडे, व्यवस्थापक दत्तात्रय माने यांच्या हस्ते गुरुदेव श्री श्री रविशंकरजी यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.**

आदर्श गुरुकुल च्या विद्यार्थ्यांनी सकाळी परिसर स्वच्छता करून सर्व विद्यार्थ्यांनी योगा करण्यासाठी तयार झाले योग प्रशिक्षक श्री नंदकुमार जी शिंदे सरांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन करताना योगा केल्याने शारीरिक ,मानसिक, बौद्धिक असा सर्वांगीण विकास होतो म्हणाले. योग प्रणाम प्रात्यक्षिक श्री केशव बादाडे सरांनी सूक्ष्म व्यायाम, त्रिकोणासन, वज्रासन ,सूर्यनमस्कार, अनुलोम, विलोम, भस्रिका, वृक्षासन ,ताडासन, भुजंगासन अनेक योगासने केली. ते म्हणाले दररोज योगासने केल्यास शरीर व मन दोन्हीही निरोगी राहते. पसायदानाने कार्यक्रमाची समारोप झाला. या कार्यक्रमासाठी मोलाचे सहकार्य सावित्री बादाडे, सुनिता लोणकर, स्वरूपा बादाडे व यशराज बादाडे यांनी केले. या कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ज्या शाळेने घडविले, त्या शाळेचे ऋण फेडण्यासाठी माजी विद्यार्थ्यांचा पुढाकार

## लाईफ कॉम्प्युटरतर्फे तिगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील १०० विद्यार्थ्यांना मोफत शालेय बॅग वाटप

**वडवणी । प्रतिनिधी**

**एखाद्या व्यक्तीच्या यशामागे त्याच्या शाळेचा मोठा वाटा असतो. बालपणी शिक्षणाचे धडे, संस्कार आणि आयुष्याला दिशा देणारी शाळा प्रत्येकाच्या मनात कायमची घर करून राहते. अशाच आपल्या शाळेप्रती असलेल्या प्रेमातून आणि कृतज्ञतेच्या भावनेतून तिगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे माजी विद्यार्थी तथा लाईफ कॉम्प्युटर, बीडचे संचालक अमित शेंडगे यांनी शाळेतील १०० विद्यार्थ्यांना मोफत शालेय बॅग वाटप करण्याचा उपक्रम राबविला.**

ज्या वर्गखोल्यांमध्ये बसून त्यांनी शिक्षण घेतले, ज्या शिक्षकांनी त्यांना घडविले आणि ज्या शाळेने त्यांच्या



स्वप्नांना पंख दिले, त्याच शाळेतील विद्यार्थ्यांसाठी मदतीचा हात पुढे करत त्यांनी समाजासमोर एक आदर्श निर्माण केला आहे. ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांच्या कुटुंबांची आर्थिक परिस्थिती मर्यादित असते. अशा परिस्थितीत नवीन शालेय साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि त्यांच्या डोळ्यांतील चमक उपस्थितांच्या मनाला स्पर्शून गेली. बॅग स्वीकारताना अनेक विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. यावेळी अमित शेंडगे यांनी सांगितले की, ''आज मी जे काही आहे, त्याची सुरुवात याच शाळेतून झाली आहे. या शाळेने मला शिक्षणासोबतच आयुष्यात पुढे जाण्याची प्रेरणा दिली. त्यामुळे या शाळेचे ऋण फेडण्याचा हा एक छोटासा प्रयत्न आहे.'' या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दलचा उत्साह वाढला असून गावकऱ्यांनी आणि पालकांनी या कार्याचे कौतुक केले आहे. माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेशी नाळ जपून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी योगदान द्यावे, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. खऱ्या अर्थाने, ही केवळ बॅग वाटपाची घटना नसून एका विद्यार्थ्याने आपल्या शाळेबद्दल जपलेल्या प्रेमाची, कृतज्ञतेची आणि सामाजिक बांधिलकीची हृदयस्पर्शी कहाणी आहे.

# पान १ वरून...

## 'आड रानातील विहीर आणि

आधीच्या कर्जमाफीचा लाभ घेतलेले हजारो शेतकरी योजनेबाहेर राहणार असल्याचा दावा त्यांनी केला. कर्जमाफीच्या मर्यादेवरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. २०१७ मध्ये एक लाख आणि २०१९ मध्ये दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्यात आली होती. त्यानंतर शेतीचा उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणात वाढला असताना २०२६ मध्येही दोन लाखांचीच मर्यादा ठणे अन्यायकारक असल्याचे त्यांनी म्हटले. निवडणुकीपूर्वी मुख्यमंत्री सातत्याने 'सातबारा कोरा करू' असे आश्वासन देत होते, मात्र प्रत्यक्षात शेतकऱ्यांचा सातबारा कोरा झालेला नसल्याची टीकाही त्यांनी केली. प्रोत्साहनपर अनुदान, कर्जमुक्ती आणि वन टाईम सेटलमेंट (ओटीएस) यामध्ये घालण्यात आलेल्या विविध अटींमुळे अनेक शेतकरी लाभापासून वंचित राहतील, असा दावा दानवे यांनी केला. तसेच ओटीएसचा पर्याय स्वीकारणाऱ्या शेतकऱ्यांना भविष्यात पुन्हा कर्ज मिळवताना अडचणी निर्माण होऊ शकतात, असेही ते म्हणाले. यावेळी त्यांनी पूर्वीच्या कर्जमाफी योजनांतील थकीत रकमेचाही मुद्दा उपस्थित केला. २०१७ च्या छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेतील सुमारे ५ हजार ९७५ कोटी रुपये आणि २०१९ च्या महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील सुमारे ४० कोटी ३० लाख रुपये अद्याप शेतकऱ्यांना मिळाले नसल्याचा दावा त्यांनी केला. जवळपास सहा हजार कोटी रुपयांची देणी बाकी असताना पुरवणी मागण्यांमध्ये केवळ २०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. सरकार ५६ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळणार असल्याचा दावा करत असले तरी पात्रतेच्या अटी लागू झाल्यानंतर प्रत्यक्ष लाभार्थ्यांची संख्या किती राहते, हे पाहावे लागेल, असे दानवे म्हणाले. केंद्र सरकारने उद्योगपतींची लाखो कोटी रुपयांची कर्जे माफ केली, मात्र शेतकऱ्यांच्या बाबतीत वेगळी भूमिका घेतली जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.ङ्गराज्यातील वीजपुरवठ्याच्या प्रश्नावर बोलताना दानवे म्हणाले की, शेतकऱ्यांना आठ तास वीज देण्याच्या घोषणा केल्या जातात; मात्र अनेक भागांत सलग दोन तासही वीज मिळत नाही. वारंवार होणारे खंडित वीजपुरवठे, सिंगल फेज आणि डबल फेजच्या समस्या तसेच प्रलंबित कृषी वीजजोडण्या यामुळे शेतकरी त्रस्त असल्याचे त्यांनी सांगितले. एक रुपयात पीकविमा योजना बंद करण्यावरूनही त्यांनी सरकारवर निशाणा साधला. २०२२ मध्ये सुमारे ९६ लाख शेतकऱ्यांनी पीकविमा काढला होता, मात्र २०२५ मध्ये हा आकडा मोठ्या प्रमाणात घटल्याचा दावा त्यांनी केला. प्रतिकूल हवामान, स्थानिक नैसर्गिक आपत्ती आणि काढणीनंतरच्या नुकसानीसाठी असलेले महत्त्वाचे विमा संरक्षण घटक बंद करण्यात आल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याचा आरोप त्यांनी केला. कांदा उत्पादकांच्या प्रश्नावर बोलताना दानवे यांनी शेतकरी आणि ग्राहक दरातील मोठी तफावत अधोरेखित केली. मुंबईत कांद्याचा किरकोळ दर ३० रुपये किलो असताना बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांना अवघे ५० पैसे ते १ रुपया किलो दर मिळत असल्याचा दावा त्यांनी केला. नाफेडमार्फत होणारी खरेदी अत्यल्प असून कांदा उत्पादकांना थेट आर्थिक मदतीची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले. शेतकरी हिताच्या मुद्द्यांवर सरकारने केवळ घोषणा न करता प्रत्यक्ष आणि प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करत दानवे यांनी सरकारच्या कृषी धोरणांवर तीव्र नाराजी व्यक्त केली

---------------

## घुले हत्येप्रकरणी सर्व आरोपींची

व्यक्तीवर प्राणघातक हल्ला तर दुसऱ्या व्यक्तीची हत्या असा दुहेरी गुन्हा घडलेला असून, पोलिस प्रशासनाने सर्व बाजूंनी वस्तुनिष्ठ तपास करून मुख्य सूत्रधाराचा शोध घेऊन सर्व आरोपींना अटक करावी, याबाबत केज पोलिसांना निर्देश दिले जावेत, अशी मागणी केली. विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी धनंजय मुंडे यांच्या मागणीची तात्काळ दखल घेऊन योग्य कार्यवाहीचे निर्देश गृह विभागाला दिले आहेत.

-------------

## एसटी कर्मचाऱ्यांना ३ टक्के

३ टक्के करण्यात आला आहे. यामुळे एसटी महामंडळावर दरमहा सुमारे ४५ कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडणार असला, तरी कर्मचाऱ्यांचे मनोबल वाढविण्यासाठी हा खर्च आवश्यक असल्याचे मंत्री सरनाईक यांनी विधानसभेत सांगितले. तसेच या आगामी काळात महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, वार्षिक वेतनवाढीची थकबाकी आणि इतर वैधानिक देणी मिळून सुमारे ५ हजार ६४९ कोटी रुपये अदा करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचेही सांगितले. शेवटी बोलताना प्रताप सरनाईक म्हणाले की, शासनाच्या या निर्णयानंतर एसटी कर्मचाऱ्यांनी २९ जून २०२६ रोजी प्रस्तावित धरणे आंदोलन मागे घेण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती देत, हा शासन आणि कर्मचाऱ्यांमधील परस्पर विश्वासाचा विजय असल्याचे सांगितले.

--------------

## खा.ओमराजे यांच्याविरोधात लहान

अचानक बंडखोरी करत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत जाहीर प्रवेश केल्याने राजकीय भूकंप झाला आहे. मतदारसंघातील प्रलंबित विकासकामे पूर्ण करणे आणि त्यासाठी लागणारा शासकीय निधी मिळवणे, याच कारणासाठी आपण सत्ताधाऱ्यांसोबत जाण्याचा निर्णय घेतला, अशी भूमिका या बंडखोर खासदारांनी मांडली आहे. या ६ खासदारांमध्ये धाराशिवचे अत्यंत लोकप्रिय आणि आक्रमक खासदार ओमराजे निंबाळकर यांचाही समावेश आहे. या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर, शिवसेना पक्षप्रमुख आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी थेट मकरंदराजे निंबाळकर यांना फोन कॉल केल्याचे समोर आले आहे. एका मराठी वृत्तवाहिनीशी बोलताना मकरंदराजेंनी या फोन कॉलला दुजोरा दिला. या संभाषणादरम्यान उद्धव ठाकरेंनी मकरंदराजेंना धाराशिव जिल्ह्यात शिवसेना पक्ष अधिक बळकट करण्याचे आणि निष्ठावंतांची फळी उभारण्याचे थेट आदेश दिले आहेत. उद्धव ठाकरेंच्या या फोननंतर आता मकरंदराजे निंबाळकर यांच्या राजकीय भूमिकेला प्रचंड महत्त्व प्राप्त झाले असून, धाराशिवमधील ठाकरे गटाची संपूर्ण धुरा आता त्यांच्या खांद्यावर येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. खासदार ओमराजे निंबाळकर यांनी शिवसेना सोडताना दिलेल्या कारणांवर मकरंदराजेंनी जाहीर नाराजी व्यक्त केली आहे. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, ''ओमराजेंनी पक्ष सोडण्यासाठी जी विकासकामांची आणि निधीची कारणे पुढे केली आहेत, ती मला वैयक्तिकरित्या अजिबात पटलेली नाहीत. धाराशिव जिल्हा हा नेहमीच शिवसेना आणि ठाकरे परिवाराचा बालेकिल्ला राहिला आहे. कठीण काळातही आम्ही उद्धव ठाकरे यांच्या पाठीशी आणि शिवसेनेसोबत पूर्णपणे एकनिष्ठ राहणार आहोत. हा बालेकिल्ला कोणत्याही परिस्थितीत शाबूत ठेवण्यासाठी आम्ही संपूर्ण ताकदीने मैदानात उतरू.'' मकरंदराजेंच्या या रोखठोक भूमिकेमुळे धाराशिवच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. दरम्यान, ज्या खासदारांनी ऐनवेळी पक्षाची साथ सोडली, त्यांच्याच मतदारसंघात जाऊन थेट जनतेशी संवाद साधण्याचे उद्धव ठाकरेंनी ठरवले आहे. याच रणनीतीचा भाग म्हणून येत्या २८ जून रोजी उद्धव ठाकरे हे धाराशिव जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. मकरंदराजे निंबाळकर आणि त्यांचे सहकारी सध्या या दौऱ्याच्या जय्यत तयारीत व्यस्त आहेत. या दौऱ्यानंतर उद्धव ठाकरे हे मकरंदराजेंना धाराशिव जिल्ह्यात मोठी राजकीय ताकद आणि रसद पुरवण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. जर असे झाले, तर आगामी काळात धाराशिवच्या राजकीय आखाड्यात खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या विरोधात त्यांचेच सख्खे लहान भाऊ मकरंदराजे निंबाळकर उभे ठाकतील. परिणामी, धाराशिव जिल्ह्यातील ही भावा-भावांमधील राजकीय लढाई संपूर्ण महाराष्ट्रात आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणार आहे.

---------------

## भूसंपादनाचे १ कोटी ३१ लाखाची रक्कम

या निर्णयामुळे संबंधित जमीनधारकांना न्याय मिळण्याच्या प्रक्रियेला गती मिळाली असून प्रकरण निकाली निघण्यासाठी महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे. जिल्हा प्रशासनाने दाखविलेल्या तत्परतेबद्दल परिसरातील शेतकरी व नागरिकांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर मौजे देवला येथील रामदास लाटे व शंकर लाटे यांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. तसेच संबंधित प्रकरणात वैयक्तिक लक्ष घालून न्यायालयीन प्रक्रियेला गती दिल्याबद्दल त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

-------------

## नवनिर्वाचित १६ आमदारांचा

महायुतीचा भाग झाले आहेत आणि आज त्यांनी आमदार म्हणून शपथ घेतली. आजच्या शपथविधी सोहळ्यात खासदार सुप्रिया सुळे यांचे व्याही अरुण लखानी यांनीही विधानपरिषद सदस्यत्वाची शपथ घेतली, ज्यासाठी रेवती सुळे यांनीही विधिमंडळ सभागृहात उपस्थिती लावली होती. शपथविधी दरम्यान सभागृहात लोकप्रतिनिधींचा उत्साह पाहायला मिळाला. भाजपचे अमर राजूरकर यांनी शपथ घेतल्यानंतर 'जय श्रीराम, जय भाजपा' अशी घोषणा दिली, तर बार्शीचे आमदार राजेंद्र राऊत यांनी 'जय शिवराय' अशी घोषणा देत सभागृहाचे लक्ष वेधून घेतले. गेल्या दोन महिन्यांत राज्यात विधानपरिषदेच्या दोन टप्प्यांत निवडणुका झाल्या आहेत. पहिल्या टप्प्यात १० जागांसाठी निवडणूक झाली, ज्यामध्ये सर्वच उमेदवार बिनविरोध निवडून आले. यात महायुतीने ९ तर महाविकास आघाडीत ठाकरेंच्या शिवसेनेकडून एका जागेवर सदस्य निवडून गेले. त्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या १७ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत ६ जागा बिनविरोध झाल्या होत्या, तर उर्वरित ११ पैकी १० जागांवर महायुतीने विजय मिळवला. महाविकास आघाडीला या निवडणुकीत एकाही जागेवर विजय मिळवता आला नाही. या १७ जागांपैकी महायुतीने १६ जागा जिंकल्या असून एका जागेवर अपक्ष उमेदवार गोकुळ गिते यांनी विजय मिळवला होता, मात्र ते आता शिंदेंच्या शिवसेनेचे सहयोगी सदस्य बनले आहेत. मंगळवारी विधानपरिषदेत शपथ घेतलेल्या १६ सदस्यांमध्ये विक्रम काकडे, अनिकेत तटकरे, धैर्यशील कदम, गोकुळ गिते, राजीव पोतदार, बसवराज पाटील, अरुण लखाणी, अमर राजूरकर, अविनाश ब्राह्मणकर, दुष्यंत चतुर्वेदी, नंदकिशोर महाजन, प्रवीण पोटे, सुहास शिरसाठ, रवींद्र फाटक, राजेंद्र राऊत आणि प्राजक्त तनपुरे यांचा समावेश आहे.

--------------

## तुकाराम मुंढेंकडून महत्त्वाची

सचिवपदाची जबाबदारी देण्यात आली होती. आता तुकाराम मुंढे हे सचिव नाहीत. त्यामुळे त्यांच्याकडे असलेली पालक सचिवपदाची जबाबदारी आता दुसऱ्या अधिकाऱ्याकडे सोपवण्यात आली आहे. डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्याकडे आता परभणीच्या पालक सचिवपदाची जबाबदारी असेल. डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार हे सध्या राज्याच्या ग्रामविकास व पंचायत राज विभागाचे सचिव आहेत. एखाद्या जिल्ह्याचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी शासनाकडून पालक सचिवपदी वरिष्ठ अधिकाऱ्याची नियुक्तील केली जाते. हे पद महत्त्वाचं मानलं जातं. त्या माध्यमातून शासनाचे धोरणात्मक निर्णय, कल्याणकारी योजना यांची प्रभावी पद्धतीने अंमलबजावणी करण्याची जबाबदारी पालक सचिवाकडे असते. संबंधित जिल्ह्याच्या पालक सचिवाला वर्षातून चार वेळा किंवा तीन महिन्यातून किमान एकदा दौरा करून विकासकामांचा आढावा घ्यावा लागतो. त्या जिल्ह्याच्या विकासासाठी नेमके उपाय सूचवण्याची, तसा अहवाल सूचवण्याची जबाबदारी पालक सचिवावर असते. अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तपदाची जबाबदारी घेताच धडाडीचे आयएएस अधिकारी अशी ओळख असलेल्या तुकाराम मुंढेंनी कारवाईचा धडाका लावला आहे. राज्यभरात विविध ठिकाणी छापेमारी करत त्यांनी अनेक ठिकाणच्या भेसळ उघडकीस आणल्या. तसेच त्यांनी या प्रकरणात अनेकांवर गुन्हे दाखल केले आहेत. त्यामुळे राज्यभरात भेसळ करणाऱ्या व्यापारी आणि दलालांचे धाबे चांगलेच दणाणल्याचं चित्र आहे. तुकाराम मुंढे यांच्या या कारवाईचे सर्वसामान्य लोकांमधून कौतुक केलं जात आहे. या कारवायांमुळे व्यापाऱ्यांच्या दबावात येऊन अन्न व औषध प्रशासनामधून त्यांची बदली करण्यात येऊ नये अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

---------------

## नांगरे पाटील नागपूरचे

विभागाचे अपर पोलीस महासंचालक म्हणून कार्यरत होते. आता ते नागपूर शहराची कायदा व सुव्यवस्था सांभाळणार आहेत. रवींद्र सिंघल : नागपूरचे मावळते पोलीस आयुक्त रवींद्र सिंघल आता विश्वास नांगरे पाटील यांच्या जागेवर, म्हणजेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अपर पोलीस महासंचालक पदाची धुरा सांभाळतील. विश्वास नांगरे पाटील हे आपल्या शिस्तबद्ध आणि धडक कार्यपद्धतीसाठी संपूर्ण महाराष्ट्रात ओळखले जातात. मुंबई, पुणे, नाशिक यांसारख्या मोठ्या शहरांमध्ये त्यांनी यापूर्वी आपल्या कामाचा धडाका दाखवला आहे. उपराजधानी नागपूरमधील गुन्हेगारीवर वचक निर्माण करणे आणि कायदा-सुव्यवस्था अधिक मजबूत करणे, हे त्यांच्यासमोरील मुख्य आव्हान असणार आहे. त्यांच्या या नियुक्तीमुळे नागपूर पोलीस दलाला एक नवे आणि गतिमान नेतृत्व लाभले आहे.

---------------

## सरकारी डॉक्टरने खासगी प्रॅक्टिस

सहयोगी प्राध्यापक डॉ. संतोष कुमार सिंग यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती नागरत्ना यांनी स्पष्ट केले की, ''उच्च न्यायालय एका मोठ्या सार्वजनिक समस्येवर सुनावणी करत आहे. हा हेतू अतिशय चांगला आहे. कारण शासकीय डॉक्टरांनी खाजगी प्रॅक्टिस करूच नये. तुम्ही स्वतः एक डॉक्टर आहात. ही सुनावणी वैयक्तिकरित्या डॉ. सिंग यांच्याविरुद्ध नसून शासकीय डॉक्टरांच्या खासगी प्रॅक्टिसच्या आरोपांशी संबंधित आहे. तुमच्याविरुद्ध वैयक्तिक असे काहीही नाही. हे खासगी प्रॅक्टिस करणाऱ्या सर्व डॉक्टरांसाठी आहे.'' दरम्यान, न्यायालयाने हस्तक्षेप करण्यास स्पष्ट नकार दिल्यानंतर वकील शर्मा यांनी उच्च न्यायालयात जाण्याच्या स्वातंत्र्यासह याचिका मागे घेण्याची परवानगी मागितली. परंतु, खंडपीठाने असे कोणतेही विशेष स्वातंत्र्य देण्यास नकार दिला आणि सांगितले की, याचिकाकर्ता एकतर याचिका फेटाळण्याचा आदेश स्वीकारू शकतो किंवा ती मागे घेऊ शकतो. अखेर ही याचिका मागे घेण्यात आली.

-----------------

cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार, दि. २४ जून २०२६



## थोडक्यात

### श्री निगमानंद विद्यालयातील शिक्षक पांडुरंग कांदे यांची कृषी सेवक पदावर निवड

शिरूर तालुक्यातील निमगाव मायंबा येथील श्री निगमानंद विद्यालयाचे शिक्षक पांडुरंग कांदे यांची महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागातील कृषी सेवक (सहाय्यक कृषी अधिकारी) या पदावर अमरावती विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयात निवड झाली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.



पांडुरंग कांदे यांनी शिक्षक म्हणून फाली या विषयात कार्य करत असतानाच स्पर्धा परीक्षेचा अभ्यास सातत्याने सुरू ठेवला. कठोर परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या बळावर त्यांनी हे यश संपादन केले.

या यशाबद्दल त्यांचा विशेष सत्कार राहुल डोंगरदिवे सर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी कांदे सरांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शासकीय सेवेसाठी शुभेच्छा दिल्या. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून सातत्यपूर्ण प्रयत्न केल्यास यश निश्चित मिळते, असा प्रेरणादायी संदेश त्यांच्या यशातून मिळत असल्याचे मान्यवरांनी सांगितले. पांडुरंग कांदे यांच्या निवडीमुळे श्री निगमानंद विद्यालय, निमगाव मायंबा तसेच संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विद्यार्थी, शिक्षक, ग्रामस्थ व विविध सामाजिक संघटनांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### आ.धस यांच्या माध्यमातून पंखाबाई रेडेकर यांना सीएम फंडातून पन्नास हजाराची मदत

प्रतिनिधी । पाटोदा

आष्टी पाटोदा शिरूर मतदारसंघातील गोरं गरीबांचे सर्व सामान्य माणसाला मदतीला धावून जाणारे नेतृत्व आरोग्यदुत आ. सुरेश आण्णा धस यांच्या माध्यमातून शिफारस मुळे व महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री आदरणीय ना .देवेंद्रजी फडणवीस साहेब व महायुतीचे सरकारने आष्टी तालुक्यातील शेतकरी आष्टी येथील आ सुरेश आण्णा धस यांचे खंदे समर्थक श्री.सुनिल दादा रेडेकर यांची आई पंखा बाई लक्ष्मण रेडेकर यांना पन्नास हजार रुपये झाले आहेत यांच्या उपचार साठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून पन्नास हजार रपये मदत मिळालेले संबंधित रेडेकर कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे. व रेडेकर ला कुटुंबाला आर्थिक दिलासा,



आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यातील मतदारसंघातील गोरं गरीबांचे सर्व सामान्य माणसाला मदतीला धावून जाणारे आरोग्यदुत म्हणून ओळखले जाणारे आमदार श्री .सुरेश आण्णा धस यांनी प्रयत्नशील असतात . श्री पंखा बाई लक्ष्मण रेडेकर हे ईपलस हॉस्पिटल अहिल्या नगर हॉस्पिटलमध्ये उपचार घेत आहेत पुढील शास्त्रीय साठी मोठा खर्च अपेक्षित असल्याने श्री सुरेश आण्णा धस यांनी हॉस्पिटलमध्ये जाऊन भेट दिली आहे स त्यानंतर लगेच आ. सुरेश आण्णा धस यांनी आरोग्य विभागचे कामं पाहणारे विकास तात्या साळवे कुटुंबाला मदतीसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून मदत देण्यासाठी सूचना केल्या सदरची कागदपत्रे सादर करुन रक्कम ईपलस हॉस्पिटल्स अहिल्या नगर यांच्या खात्या वर जमा करण्यात आली पेशंट यशस्वी हृदय शस्त्रक्रिया पार पडली आहे पंखा बाई लक्ष्मण रेडेकर यांची प्रकृती सुधारली आहे आर्थिक मदत मिळाल्यामुळे रेडेकर यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस साहेब व महायुतीचे सरकार व आमदार श्री सुरेश आण्णा धस व आभार व्यक्त केले आहे.

# महामार्गावर लुटणाऱ्या टोळीचा बीड एलसीबीकडून पर्दाफाश; चार गजाआड

बीड । प्रतिनिधी

धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर रात्रीच्या वेळी दुचाकीस्वाराला अडवून लुटमार करणाऱ्या चार जणांच्या टोळीला स्थानिक गुन्हे शाखेच्या () पथकाने जेरबंद केले आहे. या कारवाईत पोलिसांनी चोरलेली रोख रक्कम आणि गुन्ह्यात वापरलेल्या दोन मोटार सायकली जप्त केल्या आहेत.

दिनांक १६ जून २०२६ रोजी पहाटे २:३० च्या सुमारास राधेशाम नंदलाल पारीख (वय ४२, रा. विप्रनगर, पेठ बीड) हे आपल्या मोटारसायकलवरून पाळीहून बीडकडे येत होते. यावेळी बीड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील छत्रपती संभाजी महाराज चौक, समनापूर शिवारात चार अनोळखी इसमांनी त्यांना अडवले. मारहाण करून त्यांच्या खिशातील २३,००० रुपये रोख रक्कम जबरीने काढून घेतली. याप्रकरणी



बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात कलम ३०९ (६) भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर व त्यांचे पथक करत होते. तपासादरम्यान सीसीटीव्ही फुटेजचे विश्लेषण आणि गोपनीय बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार, आवेजखान परवेजखान आणि त्याच्या साथीदारांनी हा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले.

अटक करण्यात आलेले आरोपी:आवेजखान परवेजखान (वय २५, रा. बार्शीनाका, बीड) अनिकेत ऊर्फ चिक्या विश्वास डोंगरे (वय २३, रा. बार्शीनाका, बीड) अविनाश शैलेंद्र ससाणे (वय २२, रा. पंचशीलनगर, बीड) विवेकानंद दिलीप गलांडे (वय २६, रा. पंचशीलनगर, बीड) आरोपींना ताब्यात घेऊन मुद्देमालासह त्यांना बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास बीड ग्रामीण पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सोनवळे करत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत आणि अप्पर पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबीच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

## शैक्षणिक सुधारणा, शिक्षक भरती व चारा टंचाईबाबत आ. धस याची मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसोबत चर्चा

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी विधानसभा मतदारसंघातील विविध शैक्षणिक, कृषी व रोजगार हमी योजनांशी संबंधित महत्त्वाच्या प्रश्नांबाबत आ. सुरेश धस यांनी जिल्हा परिषद बीडचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांची जिल्हा परिषद कार्यालयात भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.



यावेळी व्ही. रमणी पॅटर्नच्या धर्तीवर सुरू असलेल्या मिशन जरेवाडी पॅटर्नची चालू शैक्षणिक वर्षात प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत त्यांनी विशेष आग्रह धरला. तसेच मतदारसंघातील तालुकास्तरीय कार्यशाळांचे आयोजन करून नव्याने बदली होऊन आलेल्या शिक्षकांना कामकाजाची नियमावली, शैक्षणिक उपक्रम व प्रशासनिक बाबींबाबत मार्गदर्शन करण्यात यावे, अशी मागणी केली.

जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये विशेष शिक्षकांसह इंग्रजी, गणित आणि विज्ञान विषयांच्या शिक्षकांची कमतरता असल्याच्या तक्रारी प्राप्त होत असल्याचे सांगत पदवीधर शिक्षकांची नियुक्ती करताना आष्टी व पाटोदा तालुक्यातील रिक्त पदांना प्राधान्य देण्याची मागणीही त्यांनी केली.

रोजगार हमी योजनेअंतर्गत सुरू असलेल्या सार्वजनिक कामांसह सिंचन विहीर, शेततळे, गायगोठा आदी वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी आवश्यक असलेला कुशल मजुरी निधी अनेक महिन्यांपासून प्रलंबित असल्याकडे लक्ष वेधून तो तातडीने उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित स्तरावर पाठपुरावा करण्याची विनंती करण्यात आली.

याशिवाय एल-निनोच्या परिणामामुळे पावसाला झालेला विलंब आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य चारा टंचाईच्या संकटाबाबतही त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले. आष्टी व पाटोदा तालुके हे मोठ्या प्रमाणावर दूध उत्पादन करणारे भाग असून, वेळेत पाऊस न झाल्यास पशुधनासमोर चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे पशुधन संरक्षणासाठी प्रशासनाने तातडीने नियोजन करून आवश्यक उपाययोजना राबविण्याची गरज असल्याचे आ. धस यांनी यावेळी सांगितले.मतदारसंघातील शिक्षण, कृषी, रोजगार आणि पशुधनाशी निगडित प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रशासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

## पान ६ वरून...

### विलास घुले खून

नाही तो पर्यंत विलास घुले यांच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार न करण्याची भूमिका घेतल्याने केज शहरात तणाव सदृष्य परिस्थिती निर्माण झाली आहे.

मंगळवार दि. २४ जून रोजी जमावाने एक रॅली काढून व्यापारी बांधवांनी दुकाने बंद ठेव्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यामुळे केज शहर कडकडीत बंद ठेवण्यात आले. तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौकात रस्ता रोको करण्यात आला. त्या नंतर जमावाने विलास घुले यांचा मतदेह असलेली ॲम्ब्युलन्स केज पोलिस ठाण्या समोर उभी करण्यात आली आहे.

### पाडळसिंगी, पिंपळनेर

या मागणीचा सकारात्मक विचार करत राज्य शासनाने अखेर २३० कोटी रुपयांचा भरीव निधी मंजूर केला आहे.याबद्दल आमदार प्रकाश सोळंके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुमित्रा वहिनी पवार,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्र राजे भोसले यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.या रस्त्याच्या कामामुळे माजलगाव, धारूर आणि परिसरातील अनेक गावांचा संपर्क अधिक सुलभ होणार असून वाहतूक, व्यापार,शिक्षण, आरोग्य व ग्रामीण विकासाला चालना मिळणार आहे. मतदारसंघाच्या विकासासाठी आमदार प्रकाश सोळंके सातत्याने प्रयत्नशील असून त्यांच्या पाठपुराव्यामुळे हा महत्त्वाचा निधी मंजूर झाल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे.

### कृषी कार्यालयाला अधिकारी

खर्च करून येतात; मात्र काम न झाल्याने त्यांना पुन्हा हेलपाटे मारावे लागत आहेत. खरीप हंगाम हा कृषी विभागासाठी सर्वाधिक महत्त्वाचा काळ मानला जात असल्याने कार्यालयीन वेळेत अधिकारी-कर्मचारी उपलब्ध राहणे आवश्यक आहे. त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कार्यालयातील उपस्थितीची पडताळणी करून शेतकऱ्यांना वेळेवर सेवा मिळेल, यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत.

### आष्टी-मुर्शदपूर भागातील

यांनी दिली. वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर रस्ते, पाणीपुरवठा, गटार व्यवस्था, वीज, सार्वजनिक आरोग्य सुविधा तसेच इतर मूलभूत सोयी-सुविधा सक्षम करण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मुर्शदपूर परिसर हा भविष्यातील विकासाचे केंद्र म्हणून उदयास येत असून, या भागात नियोजनबद्ध पायाभूत सुविधा उभारून नागरिकांना दर्जेदार जीवनमान उपलब्ध करून देण्याचा मानस असल्याचेही आ. धस यांनी सांगितले. विकासकामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून विविध प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. वाढत्या शहरीकरणामुळे नागरिकांच्या अपेक्षा वाढल्या असून, त्यानुसार रस्त्यांचे मजबुतीकरण, पिण्याच्या पाण्याची शाश्वत व्यवस्था, स्वच्छता, प्रकाश व्यवस्था आणि सार्वजनिक सुविधांच्या उभारणीसाठी ठोस नियोजन करण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.''विकास ही केवळ घोषणा नसून नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणण्याची प्रक्रिया आहे. मुर्शदपूर परिसराचा संतुलित व सर्वसमावेशक विकास करून या भागाला नवी ओळख देण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत,'' असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले.स्थानिक नागरिकांनीही परिसरातील विकासकामांना गती मिळाल्यास मुर्शदपूर भागाचा चेहरामोहरा बदलून हा परिसर अधिक सुसज्ज आणि आदर्श वसाहत म्हणून विकसित होईल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

### घुले हत्येप्रकरणी पाळे - मुळे

घडलेला असून, पोलिस प्रशासनाने सर्व बाजूंनी वस्तुनिष्ठ तपास करून मुख्य सूत्रधाराचा शोध घेऊन सर्व आरोपींना अटक करावी, याबाबत केज पोलिसांना निर्देश दिले जावेत, अशी मागणी केली. यावेळी विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी धनंजय मुंडे यांच्या मागणीची तात्काळ दखल घेऊन योग्य कार्यवाहीचे निर्देश गृह विभागाला दिले आहेत.

### कसल्याही दडपणाशिवाय

करावा. त्याच्या मृतदेहावर अंतिम संस्कार करावे.. तेच योग्य आहे. मी मुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करेन. योग्य न्यायासाठी आम्ही पाठिशी आहोत असे ना.पंकजाताई मुंडे यांनी म्हटलं आहे.

## श्री क्षेत्र चाकरवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह आरंभ

बीड । प्रतिनिधी

विसाव्या शतकातील महान संत वै. सद्गुरू ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली महाराज चाकरवाडीकर यांच्या २६ व्या पुण्यस्मरणानिमित्त तपोनिधी शांतीब्रह्म महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर यांच्या कुशल



मार्गदर्शनाखाली आयोजित अखंड हरिनाम सप्ताह आरंभ आज दि. २२ जून सोमवारी साधुसंत महानतांच्या उपस्थितीमध्ये करण्यात आला

विधिवत पहाटे चार वाजता माऊली दादा यांच्या समाधीचा अभिषेक व महाआरती करण्यात आली तसेच हरिनामाच्या गजरामध्ये हजारो भाविक भक्तांनी माऊली दादांच्या पालखीची व ग्रंथ मिरवणूक टाळ मृदुंग वीणा ढोल ताशाच्या गजरात काढण्यात आली.

प्रतिवर्षीप्रमाणे विधिवत साधुसंत महानतांच्या उपस्थितीमध्ये कलश स्थापना,पूजन दीप प्रज्वलन टाळ, मृदुंग, विना पूजन ध्वजारोहण साधु संत महंतांच्या उपस्थितीत करण्यात आले यावेळी ह.भ.प.श्री महंत मठाधिपती लक्ष्मण महाराज मेंगडे श्री बंकट स्वामी मठ संस्थान नेकनुर, वैराग्यमूर्ती ह.भ.प. रामकृष्ण रंधवे बापू ह.भ.प. गुरुवर्य शांतीब्रह्मा नवनाथ बाबा महाराज श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ,ह.भ.प तपोनिधी शांतीब्रह्म महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर, ह.भ.प नारायण महाराज उत्तरेश्वर पिंपरी , ह.भ.प. विठ्ठल महाराज खाडे एकनाथ महाराज संस्थान सासरा, ह.भ.प.मिसाळ महाराज, ह.भ.प. महादेव महाराज भारती श्री क्षेत्र कपिलधार ,ह.भ.प. संपत महाराज गीते बेलेश्वर संस्थान आदी साधुसंत माणसांच्या उपस्थितीमध्ये टाळकरी,माळकरी, विणेकरी भजनी मंडळ, गायनाचार्य, मृदंगाचार्य, वारकरी व भाविक भक्तांच्या उपस्थितीमध्ये फुल टाकण्याचा कार्यक्रम संपन्न झाला व विसाव्या शतकातील महान संत ज्ञानेश्वर माऊली महाराज चाकरवाडीकर यांच्या २६व्या पुण्यस्मरणानिमित्त तपोनिधी शांतीब्रह्म महादेव महाराज तात्या यांच्या मार्गदर्शनाखाली अखंड हरिनाम सप्ताह आरंभ झाला

## जाटनांदूर येथे शिवसेनेची आढावा बैठक गणीभाई शेख यांची उपतालुकाप्रमुखपदी नियुक्ती

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील जाट नांदूर येथे शिवसेनेची भव्य आढावा बैठक जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. बैठकीत संघटनात्मक बांधणी, गावागावात शिवसेनेचे जाळे अधिक मजबूत करणे, जनतेच्या प्रश्नांवर प्रभावीपणे लढा उभारणे तसेच पक्षाचे विचार तळागाळापर्यंत पोहोचविण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.



यावेळी संघटन अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने शिरूर येथील शिवसैनिक गणीभाई शेख यांची शिवसेना उपतालुकाप्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपवली असून, त्यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेचे कार्य अधिक जोमाने पुढे जाईल, असा विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. बैठकीला उपजिल्हाप्रमुख आदिनाथ खेडकर, संजय महाद्वार, रतन तात्या गुजर, सोपान काका मोरे, नवनाथ प्रभाळे, हरी मामा खेडकर, सुमित घाडगे, प्रवीण घाटे, पंढरी महाराज डोंगर, सहादेव डोंगर, विठ्ठल डोंगर, संजय कटाने, हनुमान डोंगर, माजी सरपंच श्रीरंग डोंगर, हलीम पठाण, पांडुरंग डोंगर, चांगदेव डोंगर, अशोक चौधरी, प्रसाद डोंगर, संजय डोंगर, आसिफभाई शेख, अर्जुन डोंगर, सूर्यकांत डोंगर, सुभाष डोंगर, साहेबराव डोंगर, गोरख वाल्हेकर, मोहन मैंद, तुकाराम डोंगर तसेच इतर अनेक पदाधिकारी, शाखाप्रमुख, कार्यकर्ते आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीला ह.भ.प. राम महाराज डोंगर यांचे पावन आशीर्वाद लाभले. यावेळी जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना संघटन वाढ, जनसेवा आणि तळागाळातील जनतेशी सातत्याने संपर्क ठेवण्याचे आवाहन केले.बैठकीच्या शेवटी सर्व उपस्थितांनी एकजूट - संघटन - जनसेवा हा मंत्र स्वीकारत शिवसेना अधिक बळकट करण्याचा निर्धार व्यक्त केला. तसेच नवनियुक्त उपतालुकाप्रमुख गणीभाई शेख यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील राजकीय व सामाजिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

## पुणे दुर्घटनेची पुनरावृत्ती परळीत? विषारी हातभट्टी दारू प्रकरणी युवकाचा मृत्यू; संतप्त नागरिकांचा पोलीस ठाण्यासमोर ठिय्या

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी शहरातील साठेनगर परिसरात विषारी हातभट्टी दारू पिल्याने एका युवकाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेनंतर संतप्त नातेवाईक आणि स्थानिक नागरिकांनी परळी शहर पोलीस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन करत संबंधित दारू विक्रेत्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी माजी नगराध्यक्ष वैजनाथ तात्या जगतकर, नगरसेवक नितीन रोडे, रतन आदोडे,भैय्यासाहेब आदोडे, बालाजी मस्के,नवनाथ मस्के, नागनाथ मस्के, दीपक लोंढे, ऋषिकेश क्षीरसागर, आनंद कांबळे, दर्शन लोंढे, बाळू मस्के, संजय कुमार शिंदे, बाबुराव मस्के, सोमनाथ मस्के व सर्व महिलाकेली आहे.



पुण्यात नुकत्याच घडलेल्या विषारी हातभट्टी दारू प्रकरणात अनेकांचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच परळीतही अशाच प्रकारची घटना घडल्याने नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना व्यक्त होत आहे. मृत युवकाच्या नातेवाईकांचा आरोप आहे की, साठेनगर भागात गेल्या अनेक वर्षांपासून खुलेआम हातभट्टी दारूची विक्री सुरू असून याबाबत वारंवार तक्रारी, निवेदने आणि मोर्चे काढूनही पोलिसांनी प्रभावी कारवाई केली नाही.घटनेनंतर संतप्त नागरिकांनी पोलीस ठाण्यासमोर ठिय्या मांडत, परळीत संपूर्ण दारूबंदी करा, अन्यथा मृतदेह पोलीस ठाण्यात आणून ठेवू, असा इशारा दिला. यावेळी महिलांसह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.नागरिकांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, साठेनगर परिसरातील हातभट्टी दारू विक्रीबाबत अनेकदा पोलीस प्रशासनाला माहिती देण्यात आली होती. मात्र संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात आली नसल्याने हा दुर्दैवी प्रकार घडला. त्यामुळे या मृत्यूस जबाबदार असलेल्या दारू विक्रेत्यांवर तसेच निष्काळजीपणा करणाऱ्या संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी. पुणे विषारी दारू प्रकरणात ज्या पद्धतीने दारू विक्रेत्यांवर मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करण्यात आले, त्याच धर्तीवर परळीतील या प्रकरणातही संबंधित दारू विक्रेत्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी नातेवाईक व नागरिकांनी केली आहे. दरम्यान, मृत्यूचे नेमके कारण वैद्यकीय तपासणी व अधिकृत अहवालानंतर स्पष्ट होणार असून पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत. या घटनेमुळे परळी शहरात खळबळ उडाली असून अवैध हातभट्टी दारूविरोधात कठोर कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे.

cmyk

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
बुधवार दि. २४ जून २०२६


# शेतकरी प्रश्नांवरुन विधानसभेत गदारोळ

## शेतकरी हवालदिल, पाणी नाही, रात्री २ वाजेपर्यंत झोप लागत नाही

मुंबई / प्रतिनिधी

विधानसभेत मंगळवारी नियम २९३ अन्वये शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरील चर्चेवेळी गदारोळ दिसून आला. कृषीचा प्रस्ताव येत असताना कृषीचा एकही अधिकारी सभागृहात उपस्थित नसणे यापेक्षा दुर्दैव असू शकत नाही. कृषी सचिव कुठे आहेत? असा सवाल अकोला पूर्वचे भाजपचे आमदार रणधीर सावरकर यांनी केला.

सरकारी पक्षाकडून प्रस्ताव येत असताना कॅबिनेट मंत्री नाहीत. कृषी सचिव नाहीत. राज्यमंत्री नाहीत. खरंच शेतकऱ्यांच्या बाबतीत आपण गंभीर आहोत काय? असा सवालही भाजपचे मुर्तिजापूरचे आमदार हरीष पिंपळे यांनी केला. १० मिनिटे सभागृह तहकूब करा आणि कृषीमंत्र्यांना बोलवा, अशी मागणी त्यांनी केली. यावेळी सभागृहात काहीवेळ गदारोळ झाला. देशात पाऊस नाही, शेतकरी हवालदिल झाला आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्याला दिलासा द्यायचा आहे. आज शेतकऱ्याची अशाप्रकारे थट्टा होत असेल तर हे



चित्र चांगले नाही. पावसावर एल निनोचे सावट आहे. शेतकरी चिंतेत आहे. धरणात पाणी नाही. शेतीला पाणी नाही, जनावरांना चारा नाही. लोक अन्नत्याग आंदोलने करु लागली आहेत. मोर्चे काढले जात आहेत. तरीही शेतकऱ्यांचे प्रश्न गांभीर्याने घेत नसाल तर हे खूप गंभीर बाब आहे. हा शेतकऱ्यांचा विषय आहे. पाणी नसल्याने रात्री २ वाजेपर्यंत झोप येत नाही. आज माझ्या तालुक्यात आंदोलन सुरु आहे, असे पिंपळे यांनी परिस्थिती निदर्शनास आणून दिली. जळगाव जामोदचे भाजपचे आमदार डॉ. संजय कुटे यांनीही, संवेदनशील विषयावर चर्चा होत असताना एकही अधिकारी उपस्थित नसल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. हा शेतकऱ्यांच्या जीवन मरणाचा प्रश्न असल्याचे त्यांनी म्हटले.

विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी, मंत्र्यांना निरोप दिला आहे ते दहा मिनिटांत येतील असे सांगितले. त्यानंतर लगेच कृषीमंत्री दत्तात्रय भरणे सभागृहात दाखल झाले. मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासोबत महत्त्वाची बैठक होती. जळगाव जिल्ह्यातील केळी बागा उद्ध्वस्त झाल्या आहेत. याबाबत बैठक होती. तिकडे गेलो होते, असे भरणे यांनी स्पष्ट केले.

## शेवग्याच्या या वाणाची लागवड करा; वर्षभर मिळेल भरघोस उत्पादन!



राज्यात सध्या पारंपारिक पिकांना फाटा देत, फळ पिकांच्या किंवा मग भाजीपाला पिकांच्या लागवडीकडे शेतकऱ्यांचा कल अधिक दिसून येत आहे. विशेष म्हणजे फळे आणि भाजीपाला पिकांना बाजारात वर्षभर मागणी असते. ज्यामुळे त्यातून शेतकऱ्यांना मोठी आर्थिक कमाई देखील होते. हीच बाब लक्षात घेऊन राज्यातील बरेच शेतकरी सध्या शेवगा लागवड करताना दिसून येत आहेत. शेवगा शेती ही फायद्याची शेती मानली जाते. कारण शेवग्याच्या झाडापासून प्रामुख्याने फळ, पाने, मुळे यांसारख्या सर्वच बाबींना मागणी असते. त्यामुळे नव्याने शेवगा लागवडीबाबत माहिती जाणून घेण्याची इच्छा असणारे अनेक शेतकरी असतात.

मिळते भरघोस उत्पादन : शेवग्याच्या या विशेष प्रजातीचे नाव 'पीकेएम-१' असे आहे. शेवग्याच्या जातीचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे ती बारा महिन्यातून दोन वेळा फळ देते. विशेष म्हणजे शेवग्याच्या या जातीच्या एका झाडापासून शेतकऱ्यांना वर्षभर ३० किलोपर्यंत अर्थात ६५० ते ८५० शेंगा मिळतात. बाजारात प्रामुख्याने शेवग्याला ८० से १०० रुपये प्रति किलोचा दर हमखास मिळतो. तर घाऊक बाजारात शेवग्याचा दर हा ५० ते ६० रुपये प्रति किलोच्या खाली कधीच नसतो. ज्यामुळे शेतकऱ्यांना या वाणाच्या माध्यमातून मोठी आर्थिक कमाई करता येते.

'पीकेएम-१' वाणाची वैशिष्ट्ये : हे वाण तामिळनाडू कृषी विद्यापीठाच्या पेरियाकुलम्? फळबाग संशोधन केंद्राने विकसित केले आहे. लागवडीनंतर केवळ सहा महिन्यात या वाणाला शेंगा येतात. एका शेंगेची लांबी ही साधारपणे ४० ते ४५ सेंटिमीटर इतकी असते. विशेष म्हणजे हे वाण महाराष्ट्रातील वातावरणात वर्षातून दोन वेळा भरघोस शेंगा देते. या वाणाच्या शेंगा या वजनदार, चविष्ट असतात. मात्र या वाणाचे शेंगेचे 'बी' फारसे मोठे नसते. 'पीकेएम-१' या वाणाची झाडे साडेचार ते पाच मीटर उंच वाढतात. या वाणाच्या मदतीने मिळून शेतकऱ्यांना दोन्ही हंगामात मिळून एका झाडापासून ६५० ते ८५० शेंगा मिळतात.

## शेळीच्या नायजेरियन ड्वार्फ प्रजातीचे संगोपन फायद्याचेच!

शेळी पालन हा एक फायदेशीर पैसे मिळवून देणारा व्यवसाय आहे. गेल्या काही दिवसांपासून ग्रामीण भागात शेळीपालन वाढले आहे. कमी कष्टात यामध्ये चांगले पैसे मिळवता येतात. सरकारही अनेक योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना यासाठी प्रोत्साहन देत आहे. आता सर्वात लहान जातीची शेळी पाळण्याची प्रथा शेतकऱ्यांमध्ये वाढली आहे.

कमी चाऱ्यात अधिक नफा : नायजेरियन ड्वार्फ प्रजातीच्या शेळ्यांना जास्त चारा देखील लागत नाही. तसेच जास्तीचे कष्ट देखील करावे लागत नाहीत. या शेळ्या या दिसायला अगदी लहान असल्या तरी नफा देण्याच्या दृष्टीने इतर जातीच्या शेळ्यांपेक्षा खूपच चांगले आहे. या शेळ्यांसाठी तुम्ही बांधलेले शेड अतिशय स्वच्छ असावे. वेंटिलेशन प्रणाली आणि सांडपाण्याचा प्रवाह चांगला असावा. शेळ्यांना पुरेशा प्रमाणात पोषक आहार देण्याचा प्रयत्न करा.

किती पिल्लांना जन्म देते?

नायजेरियन ड्वार्फ या शेळ्यांना हिरव्या भाज्या खाऊ घालणे खूप फायदेशीर आहे. पाण्याचे व्यवस्थापन व्यवस्थित करावे. या शेळ्यांचा प्रजनन दर इतरांपेक्षा जास्त असतो. ते वर्षभर प्रजनन करू शकतात. एक शेळी सरासरी २ ते ४ पिलांना जन्म देते. ते साधारण ६ ते ७ महिन्यांत परिपक्व



होतात आणि दूध देऊ लागतात. यामुळे इतर जातींपेक्षा ही जात फायदेशीर ठरते. या शेळ्या खूप मजबूत आणि कठोर प्राणी आहेत आणि त्यांची सहसा थोडी काळजी घ्यावी लागते.दूध उत्पादनासाठी सर्वोत्तम : शेतकऱ्यांना कमी खर्चात या शेळ्यांचे संगोपन करून चांगला नफा मिळू शकतो. ही शेळी ही मांस आणि दूध उत्पादनासाठी शेळीची सर्वोत्तम जात मानली जाते. दिवसभरात इतर जातीच्या शेळ्यांना जेवढा चार लागतो. त्यापेक्षा कमी चारा या शेळ्यांना लागतो. यामुळे अगदी कमी खर्चात कष्टात कमी गुंतवणूक करून तुम्ही तुम्ही चांगले पैसे कमवू शकतात. इतर शेळ्यांच्या शरीराच्या आकाराच्या तुलनेत जास्त दूध उत्पादक आहेत. याशिवाय त्याचे मांसही बाजारात चांगल्या दराने विकले जाते. सध्या बाजारात मांसची मागणी दिवसेंदिवस वाढतच आहे. यामुळे यामध्ये शेतऱ्यांना कधी तोटा देखील सहन करावा लागणार नाही.

## कोरडवाहू जमिनीत, कमी पाण्यात करा आवळा शेती

औषधी आणि गुणकारी फळ म्हणून आवळा सर्वांनाच माहिती आहे. आवळ्याचा उपयोग अनेक प्रकारच्या आयुर्वेदीक औषधांमध्ये होतो. आवळ्यापासून विवध पदार्थ बनविता येतात. प्रक्रिया उद्योगामध्येही आवळ्याला मोठ्या प्रमाणात मागणी असते. त्यामुळे येत्या काळात आवळ्याला मोठी मागणी राहणार आहे. हे लक्षात घेऊन तुम्हीही आवळा शेतीचा विचार करु शकता. कोरड्या उष्णकटिबंधीय, उष्ण आणि समशीतोष्ण प्रकारच्या हवामानात आवळ्याची लागवड करता येते. आवळा लागवडीसाठी महाराष्ट्राच हवामान पोषक आहे त्यामुळे कोणत्याही भागात आवळ्याची लागवड होऊ शकते. विशेष करुन आवळा अत्यंत काटक असल्याने आवळ्याची लागवड कोरडवाहू किंवा जिरायती जमिनीतही होते.

जातींची निवड :महाराष्ट्रामध्ये आवळा लागवडीसाठी कृष्णा, कांचन, एनए-१० व एनए-७ या जातींची शिफारस आहे. आवळ्याच्या बनारसी, चकय्या आणि देशी अशा जाती विकसित करण्यात आल्या आहेत. बनारसी जातीची फळे आकाराने मोठी, पिवळसर आणि चमकदार असतात. चकय्या जातीची फळे मध्यम आकाराची असून उत्पादन भरपूर मिळते, तसेच फळाचा टिकाऊपणा जास्त असतो. देशी जातीची फळे आकाराने लहान असतात. बनारसी जातीची फळे मोरावळा आणि रस करण्यासाठी, चकय्या जातीची फळे कँडी, सुपारी, रस, पावडर करण्यासाठी तर देशी जातीची फळे पावडर, लोणची तयार करण्यासाठी तर कांचन जातीची फळे गरासाठी फायदेशीर ठरतात.त्यामुळे लागवड करताना आवळ्याच्या तीन ते चार जातींची लागवड करणे फायदेशीर ठरते.

जमीन :आवळा लागवडीसाठी सुपीक, चिकण मातीचे प्रमाण जास्त असलेली आणि पाण्याचा




चांगला निचरा होणारी जमीन चांगली मानली जाते. चुनखडीयुक्त किंवा रेताड जमिनीत आवळ्याची लागवड शक्यतो टाळावी. आवळ्याच्या बियांपासून तयार केलेली रोपे प्रामुख्याने रूटस्टॉक म्हणून कलमे तयार करण्यासाठी वापरली जातात. कारण बियांपासून तयार केलेल्या रोपांपासून आकाराने छोटी, कमी दर्जाची आणि खूप कालावधीनंतर फळे मिळतात. म्हणून व्यापारीदृष्ट्या लागवडीमध्ये ती वापरत नाहीत.

लागवड हंगाम :जून ते जुलै महिन्यामध्ये लागवड केल्याने रोपांची उत्तम वाढ होते. लागवडीपूर्वी, उभी-आडवी खोल नांगरणी करून जमीन तयार करावी. ६० बाय ६० बाय ६० सेंटीमीटर आकाराचे खड्डे खोदून प्रत्येक खड्ड्यात १०-१५ किलो कुजलेले शेणखत, २५० ग्रॅम निंबोळी खत आणि २५० ग्रॅम १९:१९:१९ खत मातीमध्ये मिसळून खड्डे भरून घ्यावेत. लागवड करताना परागीभवन आणि जास्तीत जास्त उत्पादनाच्या हेतूने २:२:१ च्या गुणोत्तरामध्ये किमान तीन जातींची लागवड करावी.

पाणी आणि खत व्यवस्थापन :नवीन कलमे जगविण्यासाठी गरजेनुसार प्रत्येक झाडाला २० ते ३० लिटर पाणी १० ते १५ दिवसांच्या अंतराने द्यावे. जून, जुलै महिन्यांत पाऊस नसेल तर बागेला पाणी द्यावे. उन्हाळ्यामध्ये १५ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. आंतरपिके घेतल्यास पाणी आणि खते देण्याची विशेष गरज लागत नाही. जुलै महिन्यामध्ये पूर्ण शेणखत आणि अर्धी रासायनिक खताची मात्रा द्यावी. अर्धी रासायनिक खतांची मात्रा ऑगस्ट- सप्टेंबरमध्ये पावसाचा अंदाज घेऊन द्यावी. खतांचा वापर केल्यानंतर जानेवारी ते फेब्रुवारी महिन्यात पहिल्यांदा पाणी दिले जाते. फूलधारणेच्या काळात म्हणजेच मार्च-एप्रिलदरम्यान पाणी तोडावे. फळगळती कमी करण्यासाठी एखादे संरक्षित पाणी द्यावे.

तोडणीचा हंगाम : कलमे केलेली झाडे लागवडीनंतर तिसऱ्या वर्षापासून फळे देण्यास सुरुवात करतात, तर बियांपासून लागवड केलेल्या झाडांना ६ ते ८ वर्षे लागतात. आवळ्याला मार्च-एप्रिल महिन्यात फुले येतात. फूल ते परिपक्व फळासाठी सामान्यपणे ५ ते ६ महिने लागतात. फळधारणा झाल्यानंतर फळे सुप्तावस्थेत जातात. या काळात कोणत्याही प्रकारची आंतरमशागत करू नये. मृगाचा पाऊस पडल्यानंतर फळाची वाढ होण्यास सुरुवात होते. तोडणीचा हंगाम जातीनूसार सप्टेंबरपासून डिसेंबरपर्यंत चालतो. चांगली तयार झालेली फळे काढावीत. फळे आकडीने किंवा बांबूने हलवून काढावी लागतात. तोडणीच्या विलंबामुळे काही जातींच्या बाबतीत फळे मोठ्या प्रमाणात गळतात. तोडणी सहसा दिवसाच्या लवकर किंवा उशिरा करावी. पूर्ण वाढलेल्या १० वर्षांपुढील झाडापासून १०० ते १२० किलो फळे मिळतात. हेक्टरी १५ ते २० टन उत्पादन मिळते. आकारानुसार फळांचे तीन प्रकारात वर्गीकरण केले जाते. मोठ्या आकाराची फळे मुख्यतः कँडीसाठी वापरतात. लहान आकाराची च्यवनप्राश आणि त्रिफळा तयार करण्यासाठी वापरतात. उरलेली फळे पावडर आणि शाम्पू बनवण्यासाठी वापरतात. त्यामुळे मागणी असलेले प्रक्रिया उद्योग, बचत गटाची माहिती गोळा करुन तुम्ही आवळ्याची विक्री करु शकता. याशिवाय आवळा शेतीसोबतच तुम्ही आवळा प्रक्रिया करुन विविध पदार्थ तयार करुन अजून चांगला नफा मिळवू शकता.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१२६० : दिल्ली येथील सल्तनत साम्राज्याचे पहिले सुलतान कुतुबुद्दीन ऐबक यांचा तत्कालीन भारतातील लाहोर या प्रांतात राज्याभिषेक करण्यात आला.
१४४१ : इटन कॉलेजची स्थापना.
१५७१ : मिगेल लोपेझ दि लेगाझ्पीने मनिला शहराची स्थापना केली.
१७९३ : फ्रान्समधील पपहिल्या प्रजासत्ताक घटनेचा अवलंब केला गेला.
१८८० : ओ कॅनडाचे हे गाणे कॅनडाचे राष्ट्रगीत म्हणून पहिल्यांदा गायले गेले.
१९३९ : सयामचे थायलँड असे नामकरण करण्यात आले.
१९४० : दुसरे महायुद्ध फ्रान्स व इटलीमधे शस्त्रसंधी झाली.
१९६१ : भारतात निर्मित स्वदेशी एच. एफ २४ सुपर सोनिक लढाऊ विमानाणे भरारी घेतली.
१९६६ : मुंबईहून न्यूयॉर्कला जाणाऱ्या एयर इंडियाच्या विमान स्वित्झर्लंड देशांतील माउंट ब्लांकमध्ये दुर्घटनाग्रस्त झाल्यामुळे ११७ नागरिक ठार झाले.
१९८२ : कर्नाटकातील सर्व शाळांत कन्नड भाषा शिकविण्याची सक्ती करण्यात आली.
१९९६ : मायकेल जॉन्सनचा १९.६६ सेकंदांत २०० मीटर धावून विश्वविक्रम.
१९९८ : अभिनेते चंद्रकांत मांडरे यांना अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचा 'चित्रभूषण पुरस्कार' जाहीर
२००१ : 'आय. एन. एस. विराट' ही भारतीय नौदलाची एकमेव विमानवाहू नौका आधुनिकीकरणानंतर पुन्हा नौदलात दाखल झाली.
२००४ : न्यू यॉर्क राज्यात मृत्युदंड असंवैधानिक ठरवण्यात आला.
२०१० : जुलिया गिलार्ड यांनी ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या महिला पंतप्रधान म्हणून पदभार स्वीकारला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८६३ : प्रसिद्ध महाराष्ट्रीयन इतिहासाचार्य इतिहासकार, अभ्यासक, लेखक, भाष्यकार आणि वक्ते विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांचा जन्मदिन.
१८६२ : रविकिरण मंडळाचे संस्थापक श्रीधर बाळकृष्ण रानडे यांचा जन्म. (मृत्यू: २१ मार्च १९७४)
१८६९ : दामोदर हरी चाफेकर चार्ल्स रँड याची हत्या करणारे (मृत्यू: १८ एप्रिल १८९८)
१८९२ : श्रीधर बाळकृष्ण रानडे रविकिरण मंडळाचे संस्थापक (मृत्यू: २१ मार्च १९७४)
१८९७ : पण्डित ओंकारनाथ ठाकूर ऊर्फ 'प्रणव रंग' गायक व संगीत अभ्यासक, १९५५ मधे पद्मश्री पुरस्काराने सन्मानित (मृत्यू: २९ डिसेंबर १९६७)
१८९३ : द वॉल्ट डिस्नी कंपनी चे सह-संस्थापक रॉय ओ. डिस्नी यांचा जन्म. (मृत्यू: २० डिसेंबर १९७१)
१८९९ : मर्दानी रुप, तिन्ही सप्तकांतुन सहजपणे फिरणारा आवाज या देणग्या लाभलेले व गंधर्वयुगाची स्मृती जागवणारे नटवर्य गोपाळ गोविंद ऊर्फ नानासाहेब फाटक यांचा जन्म (मृत्यू: ८ एप्रिल १९७४)
१९०८ : गुरू गोपीनाथ कथकली नर्तक (मृत्यू: ९ आक्टोबर १९८७)
१९२७ : तामिळ लेखक कवियरासू कन्नडासन यांचा जन्म. (मृत्यू: १७ ऑक्टोबर १९८१)
१९२८ : मृणाल गोरे समाजवादी नेत्या आणि ६ व्या लोकसभेच्या सदस्य (मृत्यू: १७ जुलै २०१२)
१९३७ : ज्येष्ठ लेखिका अनिता मुजूमदार देसाई यांचा मसुरी येथे जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५५४ : भारतीय इतिहास कालखंडातील प्रसिद्ध वीरांगना गोंडवाना राज्याच्या राज्यकर्त्या राणी दुर्गावती यांचे निधन.
१८८१ : हिंदू मठाधिपती, समाजसुधारक व लेखक तसचं, आधुनिक पंजाबी गद्याचे जनक पंडित श्रद्धाराम शर्मा यांचे निधन.
१९०८ : अमेरिकन राजकारणी व अमेरिकेचे माजी अध्यक्ष स्टीफन ग्रोव्हर क्लेव्हलँड यांचे निधन. अमेरिकन इतिहासातील एकमेव राष्ट्रपती होते ज्यांनी राष्ट्रपती पदाचा सलग दोनवेळा कारभार सांभाळला.
१९१४ : वासुदेव गणेश टेंबे उर्फ टेंबे स्वामी किंवा वासुदेवानंद सरस्वती यांचा गरुडेश्वर, बडोदा, गुजरात येथे निधन. (तारखेप्रमाणे)
१९४७ : बौद्ध धर्माचे अभ्यासक पंडित धर्मानंद कोसंबी यांचे निधन. (जन्म: ९ ऑक्टोबर १८७६)
१९८० : स्वतंत्र भारताचे चोथे राष्ट्रपती वराहगिरी व्यंकटा गिरी उर्फ वी. वी. गिरी यांचे निधन.
१९९७ : संयुक्ता पाणिग्रही ओडीसी नर्तिका (जन्म: २४ ऑगस्ट १९४४)
२०१३ : इटलीचे वे४० पंतप्रधान एमिलियो कोलंबो यांचे निधन. (जन्म: ११ एप्रिल १९२०)

## फळबाग लागवडीसाठी कलमांची निवड महत्त्वाची

फळबाग लागवड करायचे ठरवले असेल तर त्यामध्ये सगळ्यात अगोदर महत्त्वाचा मुद्दा येतो तो म्हणजे जातिवंत कलमांची निवड व रोपांचा पुरवठा हा होय. फळझाडांची जर किफायतशीर लागवड करायची असेल तर त्यामध्ये रोपवाटिकेचे भरपूर महत्त्व आहे.

फळबाग लागवड करायचे ठरवले असेल तर त्यामध्ये सगळ्यात अगोदर महत्त्वाचा मुद्दा येतो. जातिवंत कलमांची निवड व रोपांचा पुरवठा हा होय. फळझाडांची जर किफायतशीर लागवड करायची असेल तर त्यामध्ये रोपवाटिकेचे भरपूर महत्त्व आहे. रोपांचा व कलमांचा जातिवंत पना तपासून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या लेखामध्ये आपण फळझाडांच्या कलमांची निवड कशी करायची याबाबत जाणून घेणार आहोत.

कलमे /रोपांची निवड :फळबाग लागवडीसाठी कलमांची निवड करताना ती जातिवंत चांगल्या प्रतीची, दर्जेदार, कीड व रोगमुक्त असावीत कलमे निवडताना ते कणखर निवडावे. निवडलेल्या कलमांच्या जातीला भरपूर फळे असावीतव त्यांना बाजारात चांगली मागणी असायला हवे. कलमे एक वर्ष वयाची मध्यम वाढीचीआणि ६० ते ७५ सेंटिमीटर असावीत. कलम केलेल्या रोपांमध्ये खुट व कलम काडीची जाडी सारखी असावीत जोड एक झालेला असावा. फळझाडांची कलम किंवा भरलेले डोळे जमिनीपासून वीस सेंटीमीटर पेक्षा ऊंच नसावेत.

cmyk



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत





# जालन्यातील उघड्या मॅनहोल्सविरोधात मानवाधिकार आयोगात याचिका

## आयएएस दर्जाचे आयुक्त असूनही 'जालनेकरां'चे मरण सुटेना!

जालना। प्रतिनिधी

जालना शहरात गेल्या काही महिन्यांपासून उघडे आणि असमान पातळीवर असलेले मॅनहोल्स सर्वसामान्य नागरिकांच्या जीवावर उठले आहेत. जालना नगरपालिकेचे रूपांतर महानगरपालिकेत होऊन मोठा कालावधी उलटला, तसेच शहराला आयएएस दर्जाचे आयुक्त लाभले, तरीही जालनेकरांच्या नशिबातील नरकयातना आणि समस्यांचे दुष्टचक्र थांबलेले नाही. महानगरपालिका प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करून आणि सातत्याने पाठपुरावा करूनही या जीवघेण्या समस्येकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आले. अखेर प्रशासनाच्या या अकार्यक्षमतेमुळे संतप्त झालेले जालन्यातील प्रसिद्ध विधिज्ञ ॲड. महेश एस. धन्नावत यांनी महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाकडे धाव घेतली असून, मुंबई येथे रीतसर याचिका दाखल केल्याने पालिका वर्तुळात प्रचंड खळबळ माजली आहे. शहराचे महापालिकेत रूपांतर झाल्यामुळे जालन्याचा कायापालट होईल आणि नागरी सुविधांचा दर्जा सुधारेल, अशी भाबडी आशा जालनेकरांना होती. मात्र, 'नाव मोठे आणि लक्षण खोटे' अशीच काहीशी परिस्थिती सध्या शहरात पाहायला मिळत आहे. महापालिकेचा कारभार एका वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्याच्या हाती असतानाही मूलभूत समस्या सोडवण्यात प्रशासन अपयशी ठरले आहे. शहरातील विविध मुख्य रस्ते आणि अंतर्गत गल्ल्यांमध्ये मॅनहोल्सचे कव्हर्स गायब आहेत किंवा अत्यंत धोकादायक अवस्थेत तुटलेले आहेत . महापालिकेकडून भुयारी गटारांच्या स्वच्छतेचे काम अर्धवट सोडण्यात आल्याने रस्त्यांवर मृत्यूचे सापळे तयार झाले आहेत . पावसाळा तोंडावर असल्याने हे उघडे मॅनहोल्स पाण्याच्या प्रवाहात अदृश्य होतील, ज्यामुळे पादचारी आणि वाहनधारकांचा जीव जाण्याचा मोठा धोका निर्माण झाला आहे.

या याचिकेमध्ये ॲड. धन्नावत यांनी एका अत्यंत गंभीर आणि धक्कादायक घटनेचा पुरावा म्हणून उल्लेख केला आहे. काही दिवसांपूर्वी कालिकुर्ती भागातील त्यांच्या घराजवळ अचानक भीषण आग लागली होती . मात्र, रस्त्यावरील असमान आणि अत्यंत खराब मॅनहोलमुळे अग्निशामक दलाची गाडी घटनास्थळापर्यंत वेळेत पोहोचूच शकली नाही .

सुदैवाने या घटनेत जीवितहानी टळली असली, तरी प्रशासनाच्या अशा ढिसाळ आणि बेजबाबदार कारभारामुळे भविष्यात एखादी मोठी दुर्घटना घडल्यास निष्पाप नागरिकांच्या मृत्यूला जबाबदार कोण, असा संतप्त आणि टोकदार सवाल या याचिकेद्वारे उपस्थित करण्यात आला आहे. या संपूर्ण कायदेशीर लढ्यावर आपली आक्रमक भूमिका मांडताना ॲड. महेश एस. धन्नावत म्हणाले की, ''सुरक्षित आणि निरोगी पर्यावरणात जगणे हा संविधानाच्या कलम २१ नुसार प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार आहे जालना शहराचा दर्जा बदलला, पालिका गेली आणि महापालिका आली, आयएएस अधिकारी आयुक्त म्हणून आले; पण जालनेकरांची सुरक्षा मात्र वाऱ्यावरच आहे. आम्ही प्रशासनाला जागे करण्यासाठी अनेकदा लेखी व तोंडी विनंत्या केल्या, पण त्यांच्या सुस्त कारभारात कोणताही बदल झाला नाही. म्हणूनच नागरिकांच्या मूलभूत हक्कांच्या रक्षणासाठी मला थेट मानवाधिकार आयोगाचे दरवाजे ठोठवावे लागले आहेत. या प्रकरणात दोषी असलेल्या प्रत्येक अधिकाऱ्यावर कडक शिस्तभंगविषयक कारवाई झालीच पाहिजे धन्नावत यांनी दाखल केलेल्या या याचिकेत मानवाधिकार आयोगाकडे अत्यंत महत्त्वाच्या मागण्या करण्यात आल्या आहेत. त्यानुसार, जालना शहरात सुरू असलेल्या पावसाळ्यापूर्वी सर्व उघडे मॅनहोल्स युद्धपातळीवर बंद करण्याचे आदेश तात्काळ महानगरपालिकेला द्यावेत .

तसेच, या गंभीर निष्काळजीपणासाठी आणि कर्तव्यात कसूर केल्याबद्दल संबंधित अभियंत्यांची व अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय चौकशी करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची शिफारस करावी . भविष्यात अशा मॅनहोल्समुळे दुर्घटना घडल्यास पालिकेने पीडितांना योग्य भरपाई द्यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे . या कायदेशीर लढ्यात ॲड. अश्विनी महेश धन्नावत या कोर्टात बाजू मांडत आहेत. ॲड. महेश धन्नावत यांनी जालन्याच्या जनतेसाठी घेतलेल्या या धाडसी पवित्र्यामुळे त्रस्त नागरिकांमध्ये आता न्यायाची नवी आशा पल्लवित झाली आहे. गेल्या पाच महिन्यांपासून सतत भीतीच्या छायेत जगणाऱ्या जनतेला आता मानवाधिकार आयोगाच्या चाबकानंतर तरी न्याय मिळेल, अशी ठाम खात्री वाटत आहे . या याचिकेनंतर तरी आयएएस आयुक्तांचे प्रशासन खडबडून जागे होणार का, की केवळ कागदी घोडे नाचवले जाणार, याकडे आता संपूर्ण जालनेकरांचे डोळे लागले आहेत.

# आंतरराष्ट्रीय विधवा दिनानिमित्त 'एकल महिला दिन' साजरा



अंबड। प्रतिनिधी

संयुक्त राष्ट्रसंघाने निश्चित केलेल्या दिनांक २३ जून आंतरराष्ट्रीय विधवा दिनानिमित्त महाराष्ट्र शासनामार्फत प्रस्तावित राज्य एकल महिला धोरणाच्या अनुषंगाने अंबड नगरपरिषदेमार्फत ''एकल महिला दिन'' उत्साहात आयोजित करण्यात आला. नगराध्यक्षा सौ. देवयानी कुलकर्णी, उपाध्यक्ष श्री. विश्वजीत खरात मुख्याधिकारी श्री. राहुल सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमामध्ये विधवा या शब्दाऐवजी ''एकल महिला'' ही संज्ञा वापरून शहरातील सर्व एकल महिलांना निमंत्रित करण्यात आले होते. कार्यक्रमादरम्यान महिलांच्या समस्या, अडचणी, अपेक्षा तसेच शासनाकडून आवश्यक उपाययोजनांबाबत चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा ज्योतिराव फुले यांच्या २०० व्या जयंती वर्षानिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी विधवा व एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी महात्मा फुले यांनी केलेल्या कार्याची माहिती उपस्थितांना देण्यात आली.

उपस्थित महिलांच्या शासकीय कागदपत्रांबाबत येणाऱ्या अडचणी जाणून घेऊन त्यांना आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले तसेच आपले सरकार पोर्टल व इतर माध्यमांतून त्या सोडविण्यासाठी मदत करण्यात आली. एकल महिलांसाठी रोजगार, स्वयंरोजगार व उपजीविकेच्या संधींबाबत चर्चा करण्यात आली. बचत गटामध्ये सहभागी नसलेल्या महिलांना बचत गटामध्ये सहभागी करून रोजगार निर्मितीबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी एकल अथवा विधवा महिलांना रूढी-परंपरेच्या आधारे दुय्यम वागणूक दिली जाणार नाही याबाबत स्थानिक स्तरावर जनजागृती करण्यात आली. प्रस्तावित राज्य एकल महिला धोरणामध्ये समाविष्ट करण्यात यावयाच्या बाबींवर महिलांची मते, सूचना व अपेक्षा जाणून घेण्यात आल्या असून त्या जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याकडे पाठविण्याबाबत कार्यवाही करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. सदर उपक्रमामुळे स्थानिक लोकप्रतिनिधी, अधिकारी व कर्मचारी यांच्यामध्ये एकल महिलांच्या प्रश्नांबाबत संवेदनशीलता निर्माण होऊन महिलांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळण्यास मदत होणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला. उपस्थित महिलांसाठी अल्पोपहार व चहाची व्यवस्था देखील करण्यात आली होती. यावेळी गटनेता श्री. अर्जुन भोजने, सभापती श्री. रामशेठ लांडे नगरसेवक शेख फेरोज, सुरेश गुढे, शाहुल खरात, इतर अधिकारी, कर्मचारी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यालय अधीक्षक सुधीर जाधव यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले, सूत्रसंचालन सहाय्यक प्रकल्प अधिकारी संजीव मैंद यांनी केले तर आभार प्रदर्शन शरद मगर यांनी मानले.

# भुकरमापक मधुकर पाटील लाच घेताना पकडला

घनसांगी। प्रतिनिधी

तक्रारदाराच्याआईच्या नावे असलेल्या जमिनिचा मोजनी नकाशा देण्यासाठी अनंत मधुकर पाटील वय ३० वर्ष पद-भुकरमापक नेमणुक, उप अधिक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, घनसावंगी जि. जालना यांना १२०००/-रुपये लाच स्विकारतांना पकडण्यात आले.आरोपी मधुकर पाटील रा. शेकटा ता. गेवराई जि. बीड

दि.२२/०६/२०२६ रोजी घनसावंगी फाटा येथील हॉटेल इंडिया येथे. लाचेची रक्कम १२,०००/-रुपये. यातील तक्रारदार यांच्या आई श्रीमती सीमा संतराम फुके यांचे नावे ग्राम बोलेगाव ता घनसावंगी जि. जालना येथील गट क्र ४४ मध्ये २ हेक्टर २३ आर जमीन असुन त्यांनी मागील ३ महिन्यांपूर्वी जमीन मोजणीचा अर्ज उप अधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय घनसावंगी येथे दिला होता. त्यानंतर दि.०८/०४/२०२६ रोजी तक्रारदार यांनी मोजणीची रक्कम १५,०००/-रू भरलेली आहे. त्यानंतर दि.२९/०५/२०२६ रोजी अनंत पाटील यांनी तक्रारदार यांच्या आईची जमीन पंचांसमक्ष मोजणी करून दिली. त्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक अनंत पाटील यांना मोजणी नकाशाची मागणी केली असता लोकसेवक अनंत पाटील यांनी नकाशा देण्यास टाळाटाळ केली. त्यानंतर दि.१८/०६/२०२६ रोजी तक्रारदार यांनी लोकसेवक अनंत पाटील यांना फोन करून नकाशाची मागणी फेलो असता लोकसेवक भूकरमापक यांनी नकाशा देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे १२,०००/-रू ची मागणी करून सोमवारी दि.२२/०६/२०२६ रोजी आणून द्या, त्यानंतर तुम्हाला नकाशा देतो असे सांगितले. आशा आशयाची तक्रार दि. २२.०६.२०२६ रोजी जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे दिली.दिनाक २२/०६/२०२६ रोजी तक्रारदारास पंचासोबत पडताळणीकामी राणी उचेगाव ता. घनसावंगी येथील शेतशिवारात पाठवले असता अनंत मधुकर पाटील यांनी तक्रारदार यांचेकडे जमीन मोजणीचा नकाशा देण्यासाठी १२,०००/-रू. लाचेची मागणी करून ती आध्यर्ध्या पाऊण तासाने घनसावंगी येथे स्विकारण्याचे पंचासमक्ष कबुल केले. त्यावरुन दि. २२.०६.२०२६ घनसावंगी फाटा येथील हॉटेल इंडिया येथे पंचासमक्ष सापळा कारवाई आजमावली असता अनंत मधुकर पाटील भुकरमापक नेमणुक, उप अधिक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, घनसावंगी जि.जालना रा.शेकटा ता. गेवराई जि. बीड यांनी लाचेची रक्कम १२,०००/-रू तक्रारदार यांचेकडून स्विकारली असता त्यांना लाचलुचपत प्रतिधक विभाग जालना चे पोलीस उपअधीक्षक बी. एस. जाधवर यांनी व त्यांच्या पथकातील अंमलदार यांनी ताब्यात घेतले. आलोसे यांची अंगझडती घेतली असता लाचेचे १२,०००/-रू व इतर १३६०/- रू असे एकूण १३.३६०/- रू. १ मोबाईल मिळून आला. आलासे यांची घरझडती प्रक्रिया सुरु आहे. आलोसे अनंत मधुकर पाटील यांच्यावर पोलीस ठाणे घनसावंगी जि. जालना येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. सदरची कामगीरी श्रीमती माधुरी केदार कांगणे, पोलीस अधीक्षक, ला. प्र. वि. छत्रपती संभाजीनगर, मा. श्री. शशिकांत सिंगारे, अपर पोलीस अधीक्षक, ला. प्र. वि. छत्रपती संभाजीनगर, यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस उपअधीक्षक बी. एस. जाधवर यांनी व पथकातील पोहेकर्का/गजानन घायवट पोअं. गणेश चेके, शिवलिंग खुळे, चालक भालचंद्र बिनोरकर, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना यांनी केली.

# मिरगात पावसाने हुलकावणी दिल्याने पेरणी आणि मशागतीची कामे मंदावली !

### शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण !



पाथर्डी । प्रतिनिधी

मे महिन्यात प्रचंड उष्णता व उन्हाळ्यात लगातार दहा ते बारा दिवस अवकाळी पाऊस पडला आणि काही प्रमाणात विहीर नदी नाले तलाव यांना पाणी आले शेतकऱ्यांनी मीरग सुरू होताच जूनच्या पहिल्याच आठवड्यात शेतातील मशागतीची कामे उरकून पेरणी सुरू केली खरीप हंगामातील कपाशी मुग सोयाबीन उडीद तूर हरभरा ज्वारी बाजरी इत्यादी नगदी पिकांची बीजपेरणी केली जूनच्या शेवटच्या आठवड्यात मंगळवारी सायंकाळी पाथर्डी तालुक्यात पावसाने हलक्याशा सरी बरसल्याने व हजेरी लावल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे परंतु गेल्या दोन आठवड्यापासून पावसाने दडी मारल्याने पेरणी व मशागतीच्या कामांचा वेग मंदावला आहे आणि शेतकऱ्यांचे डोळे आपसूकच आभाळाकडे पावसाचे दर्शन कधी होईल याकडे लक्ष लागले आहे.

# अमृतानंद महायोगेश्वर डी. फॉर्मसी कॉलेजचा १००% निकाल

मंठा। प्रतिनिधी

तालुक्यातील पांगरी गोसावी येथील श्री श्री अमृतानंद महायोगेश्वर डी. फॉर्मसी कॉलेजचा औषधी निर्माण शास्त्र पदविका (डी. फॉर्मसी) प्रथम व द्वितीय वर्षाच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून श्री श्री अमृतानंद महायोगेश्वर कॉलेजने आपल्या यशाची परंपरा कायम राखली असून कॉलेजचा निकाल १००% टक्के लागला आहे. या यशाबद्दल संस्थाध्यक्ष बी. डी.पवार, उपाध्याय नरेंद्र बी.पवार, सचिव राजेंद्र बी.पवार, प्राचार्य सचिन मोरे, प्रा.शुभम खैरे, प्रा.रवी राठोड यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# एकही वृक्षलागवड नाही; तरीही उचलली कोट्यवधींची बिले!

## विधानसभेत आ. लोणीकर यांची लक्षवेधी ;वृक्षलागवड घोटाळ्याच्या उच्चस्तरीय चौकशीची मागणी

जालना । प्रतिनिधी

झाडे लावा झाडे जगवा'' योजनेअंतर्गत जालना जिल्ह्यातील घनसावंगी, मंठा आणि परतूर तालुक्यात कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च झाल्याचे दाखविण्यात आले असले, तरी प्रत्यक्षात अनेक रस्त्यांवर एकही झाड अस्तित्वात नसल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. या प्रकरणाची दखल घेत परतूर-मंठा विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांनी मुंबई येथे सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात लक्षवेधी सूचना मांडण्याचा निर्णय घेतला आहे. आमदार बबनराव लोणीकर यांनी या प्रकरणाला ''पर्यावरणाच्या नावाखाली जनतेच्या पैशांची लूट'' असे संबोधत संपूर्ण प्रकरणाची एसीबी, ईओडब्ल्यू किंवा विशेष तपास पथकामार्फत चौकशी करण्याची मागणी केली आहे. आमदार बबनराव लोणीकर यांनी म्हटले आहे की, घनसावंगी, मंठा आणि परतूर तालुक्यातील विविध राज्य व प्रमुख जिल्हा मार्गांवर प्रत्यक्ष पाहणी केली असता वृक्षलागवडीचे कोणतेही अस्तित्व आढळून आले नाही. ज्या रस्त्यांवर हजारो झाडे लावल्याचे दाखविण्यात आले, तेथे आजही उजाड परिस्थिती दिसून येत आहे. त्यामुळे शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या निधीचा वापर नेमका कसा झाला, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

''जर झाडे लावली असतील तर ती कुठे आहेत? झाडांचे संगोपन झाले असेल तर त्याचा पुरावा काय? आणि जर झाडेच नाहीत, तर कोट्यवधी रुपयांची देयके कोणत्या आधारावर मंजूर करण्यात आली?'' असा सवालही आमदार बबनराव लोणीकर यांनी उपस्थित केला आहे. या प्रकरणात संबंधित विभागाचे अधिकारी, कामाची देखरेख करणारे कर्मचारी आणि कंत्राटदार यांच्या भूमिकेची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. मोजमाप पुस्तके (एमबी), देयकांची कागदपत्रे, छायाचित्र पुरावे, जीआयएस नोंदी आणि प्रत्यक्ष स्थळपाहणीच्या आधारे संपूर्ण सत्य बाहेर आणावे, असे त्यांनी म्हटले आहे. ''पर्यावरण संवर्धनाच्या नावाखाली जर सार्वजनिक निधीची उधळपट्टी अथवा गैरव्यवहार झाला असेल, तर दोषींना कोणतीही दया दाखवू नये. चौकशीत दोषी आढळणाऱ्या अधिकारी, कर्मचारी आणि कंत्राटदारांवर फौजदारी गुन्हे दाखल करून शासनाच्या निधीची वसुली करण्यात यावी,'' अशी मागणीही त्यांनी केली. दरम्यान, या प्रकरणामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, पावसाळी अधिवेशनात हा मुद्दा गाजण्याची चिन्हे आहेत.

# मंत्री, आमदार महोदयांनी नदीजोड, पाणी प्रश्न सभागृहातून सोडवावा

## लोकलढा आंदोलनची पत्रकाद्वारे मागणी

बीड प्रतिनिधी

गोदावरी-सिदफणा नदीजोड प्रकल्प व उपकालवा या मागणीसाठी १४० गावातील शेतकरी एकत्र येत विविध मार्गांनी सरकारकडे मागणी करीत आहेत. बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या जीवनमरणाचा हा प्रश्न आहे. त्यामुळे हा प्रश्न मंत्री व आमदार महोदय यांनी पावसाळी अधिवेशनात उपस्थित करून सोडवून घ्यावा, अशी मागणी लोकलढा आंदोलनाच्या वतीने प्रसिद्धी पत्रकाद्वारे करण्यात आली आहे.

बीड जिल्ह्यातील शेतीला हक्काचे पाणी नसल्याने शेतकऱ्यांना अनंत अडचणींना सामोरे जावे लागते. बीड जिल्ह्यात दर दोन-तीन वर्षांनी दुष्काळ पडतो त्यामुळे ऊस पिक असो वा फळबाग अशी बागायती सातत्याने तोट्यात जाते. बीड जिल्ह्यातील मोठ्या प्रमाणावर कोरडवाहू शेती आहे, या शेतीला जायकवाडी धरण अथवा कृष्णा खोऱ्याचे पाणी मिळाल्यास शेतकऱ्याची प्रश्न सुटणार आहेत. त्यामुळे गोदावरी व सिंदफणा नदीजोड प्रकल्प तात्काळ सुरू करावा व श्रीक्षेत्र भगवानगड ते माजलगाव पर्यंत उप कालवा करावा अशी मागणी १४० पेक्षा अधिक गावातील शेतकरी सातत्याने करत आहेत. यासाठी शेतकऱ्यांनी सिरसमार्ग, तांदळा, छत्रपती संभाजीनगर येथे उपोषण केले तर नुकताच बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर बैलगाडी मोर्चा काढला.

### सरकारकडून मराठवाड्यावर अन्याय

विदर्भातील वैनगंगा पैनगंगा नदीजोड प्रकल्पास शासनाने ९४ हजार कोटी रुपये मंजूर केले आहे. यासोबतच पश्चिम महाराष्ट्र व नाशिक, धुळे व जळगाव या पिकांच्या सिंचन योजनेलाही मोठ्या प्रमाणावर निधी मंजूर करण्यात आला आहे. असे असली तरी बीड जिल्ह्यातील गोदावरी सिंदफणा नदी जोड प्रकल्प व इतरही प्रकल्पांना शासन निधी देत नसल्याने एक प्रकारे हा अन्याय होत आहे. मराठवाड्यातील सिंचन प्रकल्पांना मंजुरी व निधी देऊन शासनाने हा अन्याय दूर करावा, अशी मागणीही लोकलढा आंदोलनाच्या वतीने करण्यात आली आहे.

### बीड जिल्ह्याला हक्काचे पाणी किती?

राज्य शासनाच्या वतीने १६८ टीएमसी चा नदीजोड प्रकल्प करण्यात येत आहे. या प्रकल्पातून बीड जिल्ह्यातील शेतीला किती पाणी मिळणार आहे, याचा जाब बीड जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी सभागृहात विचारून हे पाणी बीड जिल्ह्यातील शेतीला मिळवण्यासाठी तात्काळ योजना कार्यान्वित करून घ्यावी अशी मागणीही लोकलढा आंदोलनाच्या वतीने करण्यात आले आहे.

पाणी प्रश्न सुटावा यासाठी शेतकरी सतत संघर्ष करीत असले तरी शासन मात्र या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहायला तयार नाही. सध्या विधानसभेचे पावसाळी अधिवेशन चालू आहे या अधिवेशनामध्ये मंत्री व आमदार महोदय यांनी गोदावरी सिंदफणा नदी जोड प्रकल्प व उप कालवा तात्काळ करावा ही मागणी करून हा प्रश्न सोडून घ्यावा अशी मागणी प्रसिद्धी पत्रकार द्वारे लोकलढा आंदोलनाच्या वतीने करण्यात आली आहे.

टीसी हरवला आहे

बळीराम किसनराव चव्हाण या नावाचा १० वी पासचा टीसी जातेगाव ते गेवराई या प्रवासा दरम्यान हरवला आहे सापडल्यास या नंबर वर संपर्क साधावा

संपर्क
७६२०४६५६३३

# एकल महिलांनी शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा -नगराध्यक्ष वंदनाताई बोराडे

मंठा। प्रतिनिधी

महिलांच्या सक्षमीकरणासाठी शासनामार्फत विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. एकल महिलांनी या योजनांचा लाभ घेऊन आत्मनिर्भर व्हावे, असे आवाहन मंठा नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा वंदनाताई वैजनाथ बोराडे यांनी केले. मंठा नगरपंचायत कार्यालयात मंगळवार, दि. २३ जून रोजी 'एकल महिला दिन' साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.

यावेळी नगराध्यक्षा वंदनाताई बोराडे, उपनगराध्यक्षा छायाताई अरुण वाघमारे, मुख्याधिकारी अमित मांडवकर, सभापती यमुनाताई दवणे, नारायण दवणे, , नगररचना सहाय्यक वैष्णवी कुलकर्णी, पाणीपुरवठा व स्वच्छता अभियंता जयश्री शिंदे, शहर समन्वयक पल्लवी सातोनकर जयश्री पवार यांच्यासह नगरपंचायत कर्मचारी, विधवा महिला व इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान एकल महिलांना



शासनाच्या विविध योजनांची माहिती देऊन महिलांमध्ये जनजागृती करण्यात आली. ''एकल महिलांना समाजात सन्मानाने व आत्मविश्वासाने जगता यावे, तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ त्यांच्यापर्यंत प्रभावीपणे पोहोचावा, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले,'' असे मुख्याधिकारी अमित मांडवकर यांनी सांगितले. उपनगराध्यक्षा छायाताई वाघमारे यांनी सांगितले की, एकल महिलांना शासनाच्या योजनांमधून आर्थिक सहाय्य, स्वयंरोजगारासाठी मदत तसेच मुलांच्या संगोपनासाठी आधार मिळत आहे. त्यामुळे महिलांनी या योजनांची माहिती घेऊन त्याचा लाभ घ्यावा. कार्यक्रमात नगररचना सहाय्यक वैष्णवी कुलकर्णी यांनी संजय गांधी निराधार अनुदान योजना, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, बाल संगोपन योजना, 'उमेद' अभियान, बचत गट योजना तसेच प्रधानमंत्री मुद्रा योजना यांची सविस्तर माहिती दिली. याशिवाय रोजगार हमी, गृहनिर्माण प्राधान्य, विविध घरकुल योजना आणि अंगणवाडी सेविका भरतीसारख्या शासकीय सेवांमध्ये विधवा व एकल महिलांना प्राधान्य अथवा अतिरिक्त गुण दिले जात असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. तसेच याप्रसंगी नारायण दवणे यांनी मनोगत व्यक्त करत महिलांना मार्गदर्शन केले.

cmyk

# विलास घुले खून प्रकरणी केज कडकडीत बंद

## मुख्य आरोपीसह सहाजण पोलिसांच्या ताब्यात तर तिघे फरार, मृतदेह अद्यापही ठाण्यातच

केज । प्रतिनिधी

विलास घुले खून प्रकरणी दिवसभर केज शहरात कडकडीत बंद आणि रस्ता रोकोमुळे जिल्ह्यातील वाहतूक व्यवस्था प्रभावित झाली असून जागोजागी वाहने व प्रवाशी अडकून पडले आहेत. तसेच खा. बजरंग सोनवणे यांच्या मुलावर अ‍ॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल होत नाही आणि तो पर्यंत मृतदेहावर अंत्यसंस्कार न करण्याच्याची भूमिका घेत विकास घुले यांचा मृतदेह केज पोलिस ठाण्यात ठेवला आहे. या खून प्रकरणातील नऊ आरोपींपैकी



मुख्य आरोपीसह एकूण सहा आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले असून उर्वरित आरोपींचा पोलिस तपास घेत असून पोलिस पथके रवाना झाले आहेत.

दि. २० जून रोजी गावकरी हॉटेलचे मालक विलास घुले हे त्यांचा मित्र उमेश माने याला जमावाकडून मारहाण होत असल्याने त्याला सोडविण्यासाठी गेले असता रामेश्वर गायकवाड याने समर्थ हॉटेल समोर त्यांच्या पोटात चाकू भोकसल्याने उपचारा दरम्यान त्याचा मृत्यू झाला.

विलास घुले यांच्या खुनामुळे संतप्त झालेल्या नातेवाईक आणि समाज बांधवांनी विलास घुले यांच्या मारेकऱ्यांना ताब्यात घेतले जात नाही आणि या प्रकरणी खा. बजरंग सोनवणे यांचे पुत्र सौरभ सोनवणे यांच्यावर गुन्हा दाखल होत ◀◀ पान ३ वर

### सहा आरोपी अटक

विलास घुले खून प्रकरणी बाबासाहेब गुरुबा कदम, मंगेश गोरख कदम, रामेश्वर गायकवाड, शुभम रामभाऊ गायकवाड. भैय्यासाहेब गायकवाड, अजय उर्फ बंकट कदम, नवनाथ परसराम कदम, दिपक परसराम कदम आणि संतोष नरहरी कदम यांच्या विरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आहे. त्यातील मुख्य आरोपी रामेश्वर गायकवाड यांच्यासह सहा आरोपींना ताब्यात घेतले आहे. रात्री उशिरा या सहा आरोपींना न्यायालयार हजर करण्यात येणार आहे.

### लक्षण हाके केज मध्ये दाखल

ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके हे केज मध्ये हजर होत त्यांनी या प्रकरणी खा. बजरंग सोनवणे यांचा मुलगा सौरभ सोनवणे याच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

### जिल्हा पोलिस अधीक्षक केज येथे हजर

जिल्हा पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांनी केज पोलिस ठाण्याला भेट देऊन तपासा संदर्भात मार्गदर्शन केले.

### संतप्त जमावाची पोलिसा विरुद्ध घोषणाबाजी


विलास घुले यांच्या खुनामुळे संतप्त झालेल्या जमावाने केज पोलिस ठाण्यात पोलिसांच्या विरुद्ध संताप व्यक्त करीत घोषणाबाजी केली.

# पाडळसिंगी, पिंपळनेर, धारूर, आडस, लोखंडी सावरगाव रस्त्यासाठी २३० कोटींचा निधी मंजूर

## आमदार प्रकाश सोळंके यांच्या पाठपुराव्याला यश!

माजलगाव । प्रतिनिधी

येथील माजलगाव विधानसभा मतदारसंघाच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या पाडळसिंगी, पिंपळनेर, धारूर, आडस, लोखंडी सावरगाव (रा.मा. २३२) या रस्त्याच्या कामासाठी ए.डी.बी.योजने अंतर्गत तब्बल २३० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात



आला आहे. या निधीमुळे परिसरातील वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम होणार असून नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

या रस्ता कामासाठी माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्र राजे भोसले यांच्याकडे त्यांनी या रस्त्यास मंजुरी व निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती.

# अहिल्यानगर-बीड रस्त्यासाठी ९६६ कोटी मंजूर

## आ.सुरेश धस यांनी जिव्हाळ्याचा प्रश्न मार्गी लावल्याने आभार -शत्रुघ्न मरकड

आष्टी । प्रतिनिधी

अहिल्यानगर ते बीड या प्रमुख राज्य मार्ग क्र. १६ च्या ९६ किलोमीटर रस्ता सुधारणा कामासाठी राज्य शासनाने तब्बल ९६६ कोटी रुपयांचा निधी मंजूर केल्याने परिसरातील नागरिकांचा अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न मार्गी लागला असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले तसेच विशेषता सातत्यपूर्ण



पाठपुरावा करून लोकनेते आमदार सुरेश धस यांनी महत्त्वपूर्ण लोकहिताचा प्रश्न मार्गी लावल्याने कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती शत्रुघ्न मरकड यांनी आभार मानले आहेत.

शत्रुघ्न मरकड यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अहिल्यानगरबीड हा रस्ता अनेक वर्षांपासून धोकादायक वळणे, खराब स्थिती आणि वाढत्या अपघातांमुळे नागरिकांसाठी चिंतेचा विषय बनला होता. या मार्गावरून दररोज हजारो नागरिक, शेतकरी, व्यापारी आणि विद्यार्थी प्रवास करतात. त्यामुळे या रस्त्याच्या सुधारणेची मागणी सातत्याने होत होती. या प्रश्नाची गंभीरता ओळखून आमदार सुरेश धस यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रभावी प्रयत्नांना यश मिळत राज्य शासनाने ९६६ कोटी रुपयांच्या निधीस मान्यता दिली. या कामामुळे रस्त्यावरील



धोकादायक वळणे कमी होणार असून प्रवास अधिक सुरक्षित, वेगवान आणि सोयीस्कर होणार आहे. तसेच अपघातांचे प्रमाणही मोठ्या प्रमाणात घटण्यास मदत होईल, असा विश्वास मरकड यांनी व्यक्त केला. आमदार सुरेश धस यांनी जनतेच्या जिव्हाळ्याचा प्रश्न शासन दरबारी प्रभावीपणे मांडून मार्गी लावला आहे. त्याबद्दल परिसरातील सर्व नागरिकांच्या वतीने त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो असे कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती शत्रुघ्न मरकड यांनी म्हटले आहे.

# कृषी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी गैरहजर

## शेतकऱ्यांचे हेलपाटे, फिल्डवर गेल्याचे नित्याचे कारण

किल्लेधारूर । प्रतिनिधी

धारूर तालुका कृषी कार्यालयात अधिकारी व कर्मचारी सातत्याने गैरहजर राहत असल्याची तक्रार शेतकरी वर्गातून होत आहे. सध्या खरीप पेरणीचा हंगाम सुरू असल्याने बियाणे, खत, पीकविमा, पीक नोंदणी तसेच विविध शासकीय योजनांसंदर्भात माहिती घेण्यासाठी शेतकरी मोठ्या संख्येने कार्यालयात येत आहेत. मात्र सकाळच्या सत्रात अनेकदा संबंधित अधिकारी व कर्मचारी कार्यालयात नसल्याने शेतकऱ्यांना ताटकळत बसावे लागते किंवा रिकाम्या हाताने परत जावे लागत आहे

> अवजारे बँक या योजनेमधून साहित्य खरेदी केले आहे,खरेदी करून बराच कालावधी उलटला आहे अध्याप अनुदान पडले नसल्याने मी नेहमी सातत्याने कार्यलयात जात आहे मात्र याठिकाणी कोणीच नसते शिपाई यांना विचारले असता साहेब लोक फिल्डवर गेले आहेत अशी माहिती मिळते.
> दादासाहेब सिरसट(गांजपुर शेतकरी)

> कार्यालयीन कर्मचारी माझ्याकडे तीन ते चार आहेत काही कामासाठी इकडे तिकडे गेले असतील मी याबाबत कर्मचारी यांना सूचना देतो
> जनार्धन भगत(कृषी अधिकारी)

शेतकऱ्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार, कार्यालयात अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांची चौकशी केली असता फिल्डवर गेले आहेत असे उत्तर वारंवार दिले जाते. प्रत्यक्षात कार्यालयात आवश्यक कामांसाठी कोणीही उपलब्ध नसल्याने अर्ज स्वीकारणे, विविध योजनांबाबत मार्गदर्शन करणे, कागदपत्रांची पडताळणी, पीकविमा व पीक नोंदणीसंदर्भातील शंका दूर करणे यासारखी कामे रखडत असल्याचे सांगितले जात आहे. अनेक शेतकरी दूरच्या गावांमधून वेळ व प्रवासाचा

# धनंजय मुंडे यांच्या मागणीला यश, परळी मतदार संघातील महत्वाचा राज्य रस्ता होणार चकाचक

परळी । प्रतिनिधी

माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या मागणी व पाठपुराव्यास यश आले असून परळी वैद्यनाथ विधानसभा मतदारसंघातील अत्यंत महत्त्वाचा मानला जाणारा पोहनेर - सिरसाळा - मोहा - गर्देवाडी हा ३४ किमीचा राज्य रस्ता आता चकाचक होणार असून या संपूर्ण रस्त्याची दुरुस्ती व रुंदीकरण करण्यासाठी राज्य शासनाने ३४२ कोटी रुपये निधी मंजूर केला आहे. या निधीतून आता संपूर्ण ३४ किमी सिमेंट काँक्रिट रस्ता तयार करण्यात येणार आहे.

धनंजय मुंडे यांनी मागणी केल्यानंतर पावसाळी अधिवेशनाच्या पुरवणी मागण्यांमध्ये या राज्य मार्गाच्या कामास सार्वजनिक बांधकाम विभागाने आशियाई विकास बँकेच्या सहकार्याने मंजुरी दिली असून ३४



## पोहनेर - सिरसाळा - मोहा - गर्देवाडी रस्त्याच्या कामाला ३४२ कोटी रुपये निधी मंजूर

किमी सिमेंट रस्त्यासाठी ३४२ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. याबद्दल धनंजय मुंडे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा ताई अजितदादा पवार तसेच सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्र राजे भोसले यांचे आभार मानले आहेत. धनंजय मुंडे यांच्या परळी मतदारसंघातील विशेषकरून परळी तालुक्यातील वाहतुकीच्या व ग्रामीण दळणवळणाच्या दृष्टीने हा अत्यंत महत्वाचा रस्ता असून या रस्त्याच्या संपूर्ण विकासाचा शब्द श्री मुंडे यांनी आपल्या निवडणूक घोषणा पत्रात देखील दिला होता, सदर शब्द पूर्तीच्या दिशेने राज्य शासनाने मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिल्याने, लवकरच शब्दपूर्ती सह पोहनेर येथील नदीवरून पूल ते गर्देवाडी असा सिमेंट काँक्रिट रस्ता होणार आहे.

# पाटोदा कृषी विभागात मोठा बियाणे घोटाळा

## ७५ किलोऐवजी केवळ २५ किलो बियाणे देऊन शेतकऱ्यांची फसवणूक

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील कृषी विभागात अनुदानित बियाणे वाटपात मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाल्याचे धक्कादायक प्रकार समोर आला आहे. शासनाकडून मंजूर असलेल्या ७५ किलो बियाण्यांऐवजी शेतकऱ्यांना केवळ २५ किलो बियाणे देऊन त्यांची बोळवण केल्याचे आरोप शेतकऱ्यांनी केले आहेत. या प्रकरणात तालुका कृषी अधिकारी गायब असल्याने संशय अधिक गडद झाला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, अनेक शेतकऱ्यांना वैयक्तिक स्तरावर ७५ किलो बियाणे मंजूर असताना, प्रत्यक्षात त्यांच्या हातावर केवळ २५ किलो बियाणे देण्यात आले. शेतकरी गटांना प्रति सदस्य एक बॅग मिळणे अपेक्षित असताना, एका गटाला केवळ १० ते १५ बॅग देऊन उर्वरित बियाणे परस्पर लाटण्याचा गंभीर संशय व्यक्त केला जात आहे.

अधिकारी गायब, ची थट्टा

या अन्यायाविरुद्ध शेतकऱ्यांनी माहिती अधिकारांतर्गत अर्ज केले, मात्र संबंधित अधिकारी माहिती देण्यास टाळाटाळ करत आहेत. विशेष म्हणजे, तालुका कृषी अधिकारी मागील पाच दिवसांपासून कार्यालयात फिरकलेले नाहीत आणि त्यांचा फोनही बंद आहे. यामुळे ''अधिकारी गायब'' झाल्याची चर्चा रंगली आहे.

शेतकऱ्यांचा आरोप आहे की, या घोटाळ्यात एखादा 'मोठा मासा' गुंतला असून, त्याला वाचवण्यासाठी तालुका कृषी अधिकाऱ्यांना सक्तीची रजा देऊन पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

एससी-एसटी गरीब शेतकऱ्यांची फायली टेबलावर

कृषी यांत्रिकीकरण व अभियान योजनेअंतर्गत एससी-एसटी गरीब शेतकऱ्यांच्या अनुदान फायली दोन-दोन महिने टेबलावर पडून राहत असल्याचेही समोर आले आहे. अनुदान मिळत असतानाही तालुका कृषी अधिकारी जाणीवपूर्वक फायली अडवून गरीब कुटुंबांकडून पैसे उकळण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

सतीश गरजे प्रकरण

सतीश गरजे यांनी फळबाग लागवडीसाठी अर्ज केला होता. कृषी अधिकारी स्वतः स्थळ पाहणी करून अहवाल व डॉक्युमेंट्स घेतले तरी दुसऱ्या वर्षीही फळबाग मंजूर होत नाही. अधिकारी ''मॅनेज'' होऊन घोटाळे करत असल्याचा आरोप सतीश गरजे यांनी केला आहे. त्यांनी या प्रकरणी आंदोलनाची चेतावणी दिली आहे.

महिलांसोबत गैरवर्तनाचीही चर्चा

या कृषी अधिकाऱ्यांच्या स्टाफमधील महिलांसोबत गैरवर्तनाचीही गंभीर चर्चा आहे. भ्रष्टाचारासाठी हे गैरवर्तन केले जात असल्याचा एक सूर शेतकरी बांधवांमध्ये आहे.

निलंबनाची मागणी

शेतकऱ्यांनी या संपूर्ण प्रकरणाची तात्काळ उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित तालुका कृषी अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी जिल्हाधिकारी आणि कृषी विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे केली आहे. खऱ्या गरजू शेतकऱ्यांना योजनांचा लाभ मिळावा, यासाठी प्रशासनाने त्वरित दखल घ्यावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# कसल्याही दडपणाशिवाय घुले खून प्रकरणाचा तपास करा-पंकजा मुंडे

बीड । प्रतिनिधी

केज तालुक्यातील टाकळी - कदमवाडी परिसरात नुकत्याच झालेल्या विलास घुले या तरूणाच्या मृत्यूची घटना अतिशय दुर्दैवी आहे. पोलिसांनी कसल्याही दडपणाला बळी न पडता दोषींवर कडक कारवाई करावी, अशी सूचना राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी जिल्ह्याचे पोलिस अधिक्षक नवनीत कावत यांना केली आहे.



ना. पंकजाताई मुंडे यांनी या घटनेबाबत पोलिस अधीक्षक नवनीत कावत यांच्याशी विस्तृत चर्चा करून माहिती घेतली आहे. या घटनेवर बोलताना त्या म्हणाल्या, माझ्या माहितीनुसार भांडण सोडवायला गेलेल्या तरुणाला मारणं, इतकं की त्याचा मृत्यू व्हावा हे अत्यंत दुर्दैवी आहे. घटनेत विलास घुले या तरूणाला काहीही संबंध नसताना हकनाक मृत्यू स्वीकारावा लागला आहे. हे सर्व अस्वस्थ करणारं आहे. यासंदर्भात मी एसपी कावत यांच्याशी सविस्तर बोलले आहे, त्यांनी योग्य तपास करावा. मृत तरुणाच्या परिवाराने ही विश्वास दाखवून सहयोग ◀◀ पान ३ वर

# घुले हत्येप्रकरणी पाळे - मुळे खणून खरा सूत्रधार शोधावा - धनंजय मुंडे

मुंबई । प्रतिनिधी

वीस जूनच्या रात्री केज तालुक्यात घडलेल्या दुर्दैवी घटनेत हत्येचा कट रचून हल्ला एकावर केला मात्र सोडवण्यासाठी आलेल्या विलास घुले याच्यावर वार करून हत्या करण्यात आली. हे संपूर्ण प्रकरण पूर्वनियोजित कट असून याचा खरा सूत्रधार कोण, याचा शोध घेऊन विलास घुले याला न्याय मिळावा यासाठी केजमध्ये हजारो लोक घुले कुटुंबियांच्या सोबत रस्त्यावर उतरले आहेत, त्यामुळे पोलिस प्रशासनाने या प्रकरणात आरोपींची सर्व पाळे - मुळे खोदून काढत खरा सूत्रधार कोण आहे, याचा तपास करावा, अशी मागणी माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी आज विधानसभेत पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या माध्यमातून केली आहे.

विलास घुले या निष्पाप तरुणाला विनाकारण आपले प्राण गमवावे लागले, याचा तीव्र निषेध करत कुटुंबीय व हजारो नागरिक रस्त्यावर उतरले असून, हत्येच्या आज चौथ्या दिवशी सुद्धा मृतदेह ताब्यात घेऊन अंत्यसंस्कार करण्यास घुले कुटुंबियांनी नकार दिला आहे. दुसरीकडे हजारो नागरिक रस्त्यावर उतरले असुन केजमध्ये कडकडीत बंद पुकारण्यात आला असून, पोलिस ठाणे व अन्य ठिकाणी रस्ता रोको आंदोलन सुरू आहे.

दरम्यान हे प्रकरण अत्यंत गंभीर असून, या प्रकरणी कट रचून एका व्यक्तीवर प्राणघातक हल्ला तर दुसऱ्या व्यक्तीची हत्या असा दुहेरी गुन्हा ◀◀ पान ३ वर

# चालकावर प्राणघातक हल्ला करून लूट ग्रामस्थांनी चोराला रंगेहात पकडून चोपले

बीड । प्रतिनिधी

शहराच्या बाहेरील रस्त्यावर अज्ञात चोरट्यांनी एका इसमाला गाठून त्यांच्यावर लाठ्याकाठ्या आणि धारदार शस्त्राने हल्ला केला. या जीवघेण्या हल्ल्यात राजेंद्र नागरे हा व्यक्ती गंभीर जखमी आणि रक्तबंबाळ झाली आहे. त्यांच्याकडील मोबाईल आणि रोख रक्कम लुटल्यानंतर चोरटे पळून जाण्याच्या तयारीत असताना, सतर्क ग्रामस्थांनी धाव घेत एका चोरट्याला जागीच पकडले आणि पोलिसांच्या स्वाधीन केले.

मिळालेल्या माहितीनुसार, सदर व्यक्ती आपल्या कामानिमित्त जात असताना चोरट्यांच्या टोळीने त्यांना वाटेत अडवले. काही समजण्याच्या आतच चोरट्यांनी त्यांच्यावर हल्ला चढवला. हा हल्ला इतका भीषण होता की, पीडित व्यक्तीच्या पाठीवर, अंगावर, मनगटावर आणि तळहातावर गंभीर वार झाले आहेत. जखमेच्या खोल जखमेमुळे पीडित व्यक्ती जागीच कोसळली आणि मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाला.

ग्रामस्थांची सतर्कता आणि एका चोराची धरपकड

हल्ल्यानंतर पीडित व्यक्ती ओरडल्यामुळे आणि गोंधळ झाल्याने आजूबाजूच्या शेतातील आणि गावातील ग्रामस्थांनी तातडीने घटनास्थळाकडे धाव घेतली. ग्रामस्थांना येताना पाहून चोरटे घाबरले. त्यांच्यापैकी इतर चोरटे पळून जाण्यात यशस्वी झाले, परंतु सतर्क ग्रामस्थांनी एका चोरट्याला थरारक पाठलाग करून पकडले. पकडल्यानंतर ग्रामस्थांनी त्याला चांगलाच चोप दिला आणि घटनेची माहिती पोलिसांना दिली.

पोलिसांची भूमिका आणि पुढील कारवाई

घटनेची माहिती मिळताच बीड शहर पोलिसांचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पकडलेल्या चोरट्याला ताब्यात घेतले आहे. गंभीर जखमी झालेल्या व्यक्तीला तातडीने उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे. पोलिसांनी याप्रकरणी जबरी चोरी आणि प्राणघातक हल्ल्याचा गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली असून, फरार आरोपींचा शोध घेतला जात आहे. या घटनेमुळे परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26